म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.



हे परम थोर होते;
यांचेचि सम्मतें
चालावें;
हे सांगतील तसें
वागावें....





IRBK-0107611

शकुंतला कोलवडेकर.

संपादक : विनायक शिवरामराव साळवी

टी. १५ - ५८१७

सहकारी श्रमिक
प्रकाशन १

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ७६६९ नों. दि.
ग्रं. ...क्र.

अनुक्रमांक २५००५
विभाग काव्यसंग्रह
क्रमांक ८०९
नों. दि. १६।७।५८


# तुझा तूं वाढवीं राजा

: संपादक :

विनायक शिवरामराव साळवी,
बी. ए., बी. टी.

IRBK-0107611

एक रुपया



जांभ्या खडकांवरी कालवें, त्यांवरुनी खेंकडे
पहात फिरती जिथें हालत्या स्वप्रतिबिंबाकडे,
कमलमीन भयहीन उघडुनी निज पाकळिपाकळी,
नवल करीती कुणीं रेखिल्या पुलिनीं रंगावली;
तेथें होता दुस्मानाला अखण्ड वितरुनि भया,
दर्यावर दावीत दरारा विजयवंत घेरिया !
उत्तरेस 'आ' पसरुनि बसला प्रचण्ड रत्नागिरी
दक्षिणेस करवीरकरांचा शिवलंका सागरीं;
मध्यें शोभे मरकतगिरीच्या मणिमय सिंहासनी
सत्ताविस दुर्भेद्य गडांचा राजा तळ कोंकणी !
दोन बाजुंना हुकुमी बन्दे, शौर्याचे सागर
मर्द खडे यशवंत, देवगड वाराया चामर
मध्यें विलसे घेर तिहेरी कोटाचा घालुनी
सत्ताविस रणमस्त हुड्यांचा राजा तळकोंकणी !
प्रशान्त उत्तर तटीं पसरलें वैजयन्तिचें जल
चाले दक्षिणतटीं जलधिची खडकांतुनि खळबळ;
पूर्व दिशेला खन्दक नेई आशा अरिची लया
पश्चिमाब्धिवर दावि दरारा विजयदुर्ग घेरिया !

— माधव

टो. ५ - ७६१७

सहकारी श्रमिक
प्रकाशन १

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा क्र. ७६९९ नों. दि ........
पु. ....पा.वा.. क्र. ........

अनुक्रम २४००५
विभाग
क्रमांक ००९
नों. दि. १५।७।५८
वाचनालय शाखा

# तुझा तूं वाढवीं राजा

: संपादक :
विनायक शिवरामराव साळवी,
बी. ए., बी. टी.

IRBK-0107611

एक रुपया

# अ र्प ण

कर्मवीर भाऊराव पाटील यांना
सादर, स्नेहपूर्वक अर्पण—

★

## विषय सूची


| विषय | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १. या पुस्तकाची प्रेरणा | ... | ... | ३ |
| २. तुझा तूं वाढवीं राजा | ... | ... | ७ |
| ३. थोडी उजळणी | ... | ... | ९ |
| ४. कीं धुगधुगी आहे ती धगधगीत व्हावी— | ... | ... | १४ |
| ५. चिथावणी नव्हे ! लोकजागृति—! | ... | ... | १७ |
| ६. त्यांचा मुद्दा मनास आणविणें— | ... | ... | १९ |
| ७. आदराचें आणि पराक्रमाचें बोलणें | ... | ... | २० |
| ८. अवहेलना, आमिषें आणि धमक्या | ... | ... | २३ |
| ९. आंगें अर्ज करण्याची गौरवशाली परंपरा | ... | .. | २५ |
| १०. बलात्कार सर्वथैव न करावा | ... | ... | २७ |
| ११. भीमाचें बळ आणि वायुरूप शरीर | ... | ... | २९ |
| १२. जें कोणाच्याच ऊर्जिताचें नव्हे ! | ... | . . | ३२ |
| १३. कांहींहि करण्यास तयार असा बादशाही बंदा ! | ... | ... | ३४ |
| १४. कलागती करावयाची गरज नाहीं ! | . | ... | ३८ |
| १५. गनीम जालेस बरा नतीजा पावाल ! | ... | ... | ४० |
| १६. मराठिया लोकांचें बरें करावें— | ... | ... | ४२ |
| १७. उपेक्षेच्या जागीं आदर— | ... | ... | ४४ |
| १८. ऐसा विचार करावा होता— | ... | ... | ४६ |
| १९. तृणानें अग्नि झांकितां ! | ... | ... | ५० |
| २०. टोपीकर वरकड सावकारांसारखे नव्हत ! | ... | ... | ५३ |
| २१. माझ्या मराठी मातीचा— | ... | ... | ५५ |

अनुक्रम २५००४
विभाग ८१७ वा.
क्रमांक ८०९
१६५७५

# १. हा प्रयत्न आणि त्याच्यामागें असलेली प्रेरणा—

रत्नागिरी शहर आणि त्याची पंचक्रोशी यांत राहणाऱ्या मराठा समाजाच्या विद्यमानें श्री शिवाजी महाराजांची जयंति साजरी होत असते. सन १९४९ सालीं हा मंगल दिवस साजरा झाला, तेव्हां त्या उत्सवाला, कर्मवीर भाऊराव पाटील हे अध्यक्ष, आणि डॉ. ए. जी. पवार, एम्. ए., पी. एच् डी. हे मुख्य वक्ते, असा सुयोग साधला होता.

त्या पवित्र प्रसंगीं या दोघां श्रेष्ठ पुरुषांनीं जीं भाषणें केलीं तीं अशीं उद्‌बोधक आणि इतकीं स्फूर्तिदायक झालीं, कीं ज्या सज्जनांना तीं भाषणें ऐकायला मिळालीं त्या सज्जनांपैकीं अनेकांच्या अंतःकरणांत त्या भाषणांच्या आठवणी, आजसुद्धां, ताज्या आहेत.

डॉ. पवारसाहेबांच्या भाषणाच्या ओघांत, डॉक्टरसाहेबांनीं, श्री शिवरायांच्या असामान्य चरित्राचे एकदोन खासे पैलू श्रोत्यांना दाखविले. तें धन्य दर्शन घडवितांना, डॉक्टरसाहेबांनीं, कांहीं जुनीं पत्रें श्रोत्यांना वाचून दाखविलीं. तीं पत्रें श्री शिवाजीमहाराजांनीं लिहिलेलीं होतीं.

तें पत्रवाचन ऐकत असतां ऐकणारांच्या अंतःकरणांना जो अमृताचा शिडकाव झाला तो असा होता—

अत्यंत आशावादी आणि विधायक वृत्तींना सर्वस्वीं वाहिलेला, अशा एका युगप्रवर्तक सत्पुरुषानें, नारायणाच्या पदवीला पोंचलेल्या एका नरपुंगवानें, हीं पत्रें लिहिलीं आहेत. सर्वसामान्य माणसांच्या माणुसकीला हाक मारावी यासाठीं या असामान्य पुरुषानें हीं पत्रें लिहिलीं आहेत.

या पत्रांतील शब्दन्‌शब्दांत खुणा आहेत, कीं हीं पत्रें लिहिणाऱ्या जगद्वंद्य पुरुषानें सर्वसामान्य माणसांची माणुसकी पुरेपूर ओळखली आहे; त्या माणुसकीच्याबाबत त्याला कांहीं विश्वास वाटत आहे; त्या माणुसकीच्याबाबत त्याच्या कांहीं श्रद्धा आहेत.

विशाल अंतःकरणाच्या या पुरुषानें, अर्थातच, जाणीव ठेवलेली आहे, कीं सर्वसामान्य माणसांची ही माणुसकी नेहेमींच जागी असत नाहीं; ती वारंवार झोंपी जाते—आणि निसूर तर नेहेमींच असते !

—पण धीरोदात्त चरित्राच्या या पुरुषानें अशीहि अंतरींची खूण पटवून घेतलेली आहे, कीं सर्वसामान्य माणसांची माणुसकी जरी झोंपी जात असली तरी ती जागीहि होत असते; तिला जागी करतां येते; जागी होण्याची तिची शक्ति अपरंपार आहे; सर्वसामान्य माणसांच्या माणुसकीला केलेलें आवाहन वायां जात नाहीं; सर्वसामान्य माणसें आपल्या स्वतःच्या माणुसकीला जागतात आणि तशाच थोरवीनें वागतात.

डॉक्टर पवारसाहेबांच्या त्या भाषणांत श्रोत्यांना सारखें ऐकूं आलें आणि समजलें, कीं—

महाराष्ट्राच्या कवींनीं आणि साधुसंतांनीं तेजस्वी जिवंतपणाची जी शिकवण महाराष्ट्राला दिली आणि मराठी मनांत झोंपीं गेलेल्या सकसपणाला, सरळपणाला सात्त्विकपणाला, साधेपणाला, आणि सालसपणाला जाग आणून ‘सत्या’ला ‘शिवा’ला व ‘सुंदरा’ला सदैव वाहिलेलें राहील असें मराठी मन तयार केलें त्या मराठी मनाला साक्ष ठेवून आणि त्या मराठी मनाला शरण राहूनच श्रीशिवरायांनीं स्वतःचें अवतार-कार्य आंखलें आणि पार पाडलें. त्या ‘साक्षी’चें, त्या ‘शरण’पणाचें प्रतिबिंब अशींच हीं पत्रें आहेत. साधे-भोळे परंतु श्रद्धांना वाहिलेले अशा मराठ्यांनीं, मराठी मातीच्या मानी लेंकरांनीं, ‘मराठेंच राहिलें पाहिजे’ अशी प्रतिज्ञा मराठ्यांना द्यावी यासाठींच मराठ्यांच्या परमपुरुषानें हीं पत्रें लिहिलीं आहेत.

मान्यवर पवार साहेबांनीं केलेलें तें पत्रवाचन म्हणजे आदर्श होता, कीं गाढ अर्थानें भरलेलीं असलीं बहुमोल पत्रें कशीं वाचावीं; आणि तीं वाचतांना कसें तन्मय व्हावें आणि आपल्या अंतरंगाला कसें अभ्यंगस्नान घडवावें.

डॉक्टरसाहेबांचें तें पत्रवाचन मीं ऐकलें तेव्हां माझ्या मनांत येऊन गेलेला एक विचार माझ्या अनेक इष्टमित्रांना मी बोलून दाखविला आहे : हीं निवडक पत्रें गोळा केलीं जावीं; डॉ. पवारसाहेबांसारख्या श्रेष्ठ पुरुषांकडून त्यांचें वाचन करविलें जावें; त्या वाचनाच्या ध्वनिमुद्रिका तयार केल्या जाव्या आणि केवळ आम्हां साडेतीन कोटी मराठ्यांच्याच घरांतून नव्हे, तर या जगाच्या—परमेश्वराचें हें जग, जें नेहेमीं माणुसकीला वाहिलेलें राहणार आहे त्या जगाच्या—कोनाकोंपऱ्यांत त्या ध्वनिमुद्रिकांनीं माणुसकीला आवाहनें करावीं आणि आळवावें.

मी कृतज्ञपणें नमूद करीत आहें, कीं डॉक्टर पवारसाहेबांचें तें पत्रवाचन आणि त्या वाचनासोबत डॉक्टरसाहेबांनीं केलेलें विद्वत्तापूर्ण विवेचन-यांपासून पुष्कळच गोष्टी मी शिकलों. या पुस्तकांत घेतलेल्या मूळ मजकुरालगत, आधीं आणि नंतर, प्रास्ताविकें, टीपा किंवा प्रश्न यांपैकीं कोणत्याहि प्रकारचा, जो मजकूर मीं जोडला आहे त्यांतला बहुतेक मजकूर, मला, या 'शिकवणी' मुळेंच सुचला आणि साधला आहे.

हें पुस्तक कोणी वाचावें आणि कसें वाचावें याविषयींच्या माझ्या कल्पना या ठिकाणीं मांडण्याचें धाष्टर्य मी करीत आहें—

माझा हेतु आहे, कीं दहा ते चौदा वर्षें वयाच्या मुलां-मुलींनीं हें पुस्तक वाचावें. पण—

या कोंवळ्या वयांचीं मुलें, त्यांच्याच परीनें, हें पुस्तक वाचतील तर त्या वाचनापासून त्या कोंवळ्या वाचकांना बेताचाच लाभ होईल. पण तेंच जर—

कोणी जाणतीं माणसें,—शिक्षक, पालक वा इतर आप्तेष्ट यांच्यापैकीं कोणी—मुलांच्यासोबत हें पुस्तक वाचतील आणि मुलांना मार्गदर्शन आणि साहाय्य करतील, तर त्या वाचनानें मात्र मुलांना खराखुरा व प्रमाणशुद्ध असा लाभ होईल. आमचीं मुलें जें वाचतात त्या वाचनानें आमच्या मुलांचे स्वभाव तयार झाले पाहिजेत. आमच्या मुलांना वळण लागलें पाहिजे, कीं चौकसपणें, रसिकपणें, सहृदयपणें कसें वाचावें.

या पुस्तकांत मीं प्रास्ताविकें लिहिलीं आहेत, टीपा दिल्या आहेत, प्रश्न विचारले आहेत आणि व्यवसाय योजिले आहेत. हें सर्व करतांना मीं, माझ्या अल्पमतीप्रमाणें, हेतु बाळगिला आहे, आणि प्रयत्न केला आहे, कीं वाचनविषयक जीं उद्दिष्टें मीं वर म्हटलीं आहेत तीं या पुस्तकाच्या वाचनाच्या वेळीं, थोडींफार साधावीं.

मला जाणीव आहे—आणि समाधानहि आहे—कीं वाचनविषयक जीं उद्दिष्टें मीं दृष्टीसमोर ठेवलीं आहेत, आणि तीं साधावीं यासाठीं हे प्रश्न इत्यादि जे मीं योजिले आहेत त्याहून अधिक उद्‌बोधक आणि प्रेरक असे प्रश्न, सूचना व व्यवसाय योजिणें शक्य आहे, आणि सहृदय अशा

असंख्य शिक्षकांना आणि पालकांना ते सुचण्यासारखे आहेत. मला विश्वास वाटतो, कीं हें छोटेंसें पुस्तक जिथें जिथें वाचलें जाईल, तिथें तिथें असले प्रश्न इत्यादि विचारले जातील आणि मुलांचें वाचन जसें झालें पाहिजे तसें होईल.

हें पुस्तक प्रकाशित करण्याचा पहिला प्रयत्न मीं १९५३ सालीं केला. परंतु तो यशस्वी झाला नाहीं. त्यावेळीं माझ्या कांहीं मित्रांचें आणि माझें मनोराज्य होतें कीं, त्या प्रकाशनाच्या वेळीं सहकारी श्रमिक प्रकाशन नांवाच्या प्रकाशन संस्थेचें बीजारोपण करावें. तो प्रयत्न—केला-न-केला असा झाला आहे. त्या प्रयत्नाच्या जोडीला हा आणखी एक प्रयत्न मी करीत आहें. माझी व माझ्या सहकाऱ्यांची प्रार्थना आहे, कीं जनताजनार्दनाचा वरदहस्त आमच्या मस्तकावर रहावा—आमच्या या प्रयत्नाला पाहून जनता-जनार्दनानें प्रसन्न होऊन आम्हांला म्हणावें—

"आम्हीं ओळखलें आहे, कीं आमच्या होतकरू मुलांमुलींपैकीं प्रत्येकाकडे पाहाण्याची तुमची दृष्टि—

**सकल जग तुझें, तूं जगताचा**
**मार्ग तुझा जन कल्याणाचा**
**चराचरांतुन कणाकणांतुन**
**हवें तुला उज्ज्वल उत्तेजन**

अशी आहे. या तुमच्या दृष्टीला आणि ती दृष्टि ठेऊन तुम्हीं ज प्रयत्न करीत आहां त्या प्रयत्नांना आमचा पूर्ण आशीर्वाद आहे—".

आमचें हें पहिलें प्रकाशन आम्हीं, कर्मवीर भाऊराव पाटील यांना आदरपूर्वक अर्पण केलेलें आहे. त्यांच्या छायाचित्रानें या पुस्तकाला शोभा आणणें आवश्यक होतें, परंतु या छपाईच्या वेळीं आमची सर्व धांवपळ उडाली आहे. पुढच्या आवृत्तीच्या वेळीं ती जबाबदारी आम्हीं दक्षतेनें पार पाडूं.

सर्वांचा नम्र

**विनायक शिवरामराव साळवी**

## २. तुझा तूं वाढवीं राजा—

श्री शिवाजी महाराजांनीं, प्रतापगडावर, श्री तुळजाभवानी देवीची स्थापना केली. ही गोष्ट श्रीसमर्थ रामदासांच्या अगदीं मनासारखी झाली. किंबहुना त्यांना कल्पनासुद्धां नव्हती इतक्या थोर रीतीनें ही गोष्ट झाली. रामदासांचा आनंद त्यांच्या अंतःकरणांत मावेना. त्या आनंदाच्या भरांत रामदासांनीं ओव्या रचल्या आणि त्या ओव्या श्रीतुळजाभवानीच्या पायांवर वाहिल्या.

त्या ओव्या अशा—

उदंड ऐकिलें होतें । रामासी वरु दीधला ।
मी दास रघुनाथाचा । मज हो वरदायिनी ॥

श्रेष्ठांचा नौस जो होता । तो मी फेडीनसें म्हणें ।
पुष्प देउनि उतराई । ऐसें हें कल्पिलें मनीं ॥

तुळजापुर ठाकेना । चालिली पश्चिमेकडे ।
पारघाटीं जगन्माता । सद्य येउनि राहिली ॥

ऐसें हें ऐकिलें होतें । हेत तेथेंचि पावला ।
पुष्पाची कल्पना होती । तेथें पुष्पचि दीधलें ॥

ऐसी तूं दयाळू माता । हेमपुष्पचि घेतलें ।
संतुष्ट भक्तिभावानें । त्रैलोक्यजननी अहा ॥

थोड्यानें श्लाघ्यता केली । थोर संतोष पावलों ।
उत्तीर्ण काय म्यां व्हावें । तुझे कृपेसि रोकडे ॥

तुझेंचि तुजला दिल्हें । म्यां हें कोठुनि आणिलें ।
संकटें वारिलीं नाना । रक्षिलें बहुतांपरीं ॥

जीवींचें जाणते माता । तूं माता मज रोकडी ।
लोकांच्या चुकती माता । आचुक जननी मला ॥

येकची मागणें आतां । द्यावें तें मजकारणें ।
तुझा तूं वाढवीं राजा । सीघ्र आम्हांचि देखतां ॥

दुष्ट संहारिले मागें । ऐसें उदंड ऐकतों ।
परंतु रोकडें कांही । मूळ सामर्थ्य दाखवीं ॥

देवांचीं राहिलीं सत्त्वें । तूं सत्त्व पाहसीं किती ।
भक्तांसि वाढवीं वेगीं । इच्छा पूर्ण परोपरीं ॥

रामदास म्हणे माझें । सर्व आतुर बोलणें ।
क्षमावें तुळजे माते । इच्छा पूर्णचि ते करी ॥

पहिल्याच ओवींत श्री रामदासांनीं देवीला जी हांक मारली आहे ती कशी मारली आहे ? त्या ओवींत रामदासांनीं देवीकडे काय मागितलें आहे ? रामदास जो वर मागत आहेत तो वर कोणता ? देवीचे उतराई होण्यासाठीं काय करावें असा श्री रामदासांचा विचार होता ? देवी कोठून निघाली होती ? कोणीकडे चालली होती ? कोठें थांबली ? तिला कोणी थांबविलें ? श्री रामदासांची आणि तुळजाभवानीच्या इतर अनेक भक्तांची इच्छा होती, कीं देवीची स्थापना करावी आणि तिची पूजा अर्चा करावी. त्या सर्व भक्तांची ती गाढ भक्ति देवीनें ओळखिली आणि ती प्रसन्न झाली. तिनें ठरविलें कीं या भक्तांसन्निध थांबावें आणि त्यांच्याकडून पूजा घ्यावी. या भक्तांनीं जी पूजा केली असती ती साध्या फुलांनीं केली असती, पण देवीच्या प्रतिष्ठापनेच्या वेळीं श्री शिवाजी महाराजांनीं, सोन्याच्या फुलांनीं देवीची पूजा केली ! हें पाहून त्या सर्व भक्तांना किती आनंद झाला असेल ! समर्थांना जो आनंद झाला तो समर्थांनीं कसा व्यक्त केला आहे ? देवीच्या पूजेसाठीं सोन्याचीं फुलें मिळालीं हें पाहून समर्थांना आनंद झालाच. पण तेच समर्थ, तिथल्या तिथें, म्हणाले आहेत, " देवी भक्तिभावानें संतुष्ट होते. " असें ते कां म्हणाले आहेत ? 'थोड्यानें श्लाघ्यता केली' यांत रामदासांना काय म्हणावयाचें आहे ? 'जीवींचें जाणते माता' या शब्दांत कोणती भावना आहे ? 'लोकांच्या चुकती माता' असें जें रामदासांनीं म्हटलें आहे त्यांत रामदासांना काय म्हणावयाचें आहे ? त्यांची 'आचुक जननी' कोण ? रामदासांनीं असें कां म्हणावें ? 'शीघ्र आम्हांचि देखतां' असें आर्जव जें केलें आहे त्या आर्जवांत कोणती भीति दिसते ? 'दुष्ट संहारिले मागें...सामर्थ्य दाखवीं' ही ओवी कोणत्या आवेगामुळें उमटली आहे ? रामदासांना अशी भीति वाटली काय, कीं आपण एवढा धांवा केल्यानंतरहि देवी म्हणेल, 'माझाच तेवढा धांवा कां करतां ? इतर देवांनाहि आळवा—' ? रामदासांना ही भीति वाटली म्हणूनच त्यांनीं, तुळजाभवानीच्या पायांजवळ, 'आतां आमचा आणखी अंत पाहूं नको' असें धरणें धरलें आहे काय ? शेवटच्या ओवींत समर्थांनीं, देवीच्या पायांवर कशी लोळण घेतली आहे ?

भरतखंड सोन्याची पुतळी त्रिखंड कीरत फिरे
सरस्वतीचे लाल उभविती तिचीं यशोमंदिरें
तिचाच हा विस्तार पसरला पहा दक्षिणेकडे
दऱ्या आणि खोऱ्यांची भूमी कडेच चोहींकडे
आणि पठारी तिचे लाडके पाइक पुरुषोत्तम
जयजयकारासाठीं तियेच्या रोविती कलपद्रुम
लाख हिरे ओंवाळुन टाका असा तयांचा धनी
महाप्रतापी प्रभू शिवाजी उदार वीराग्रणी
महाराष्ट्र हा केवळ त्याचा दुसरा परमेश्वर
नाहिं असा कुणि भक्त जाहला दुसरा धरणीवर
महाशूर महशूर जाहले होऊन गेले किती
परी प्रभू शिवराय आमुच्या धर्माचा सारथी
सद्धर्म प्रतिपालक म्हणजे भाग्यवंत हा हिरा
सुराज्य आणिक स्वराज्यसंस्थापकांत हा मोहरा
क्षेत्र द्वारका दूर योजनें अनंत येथुनि जरी
महाराष्ट्र हें तीर्थ करी श्रीप्रतापगड केसरी

— अज्ञातवासी.

## ३. थोडी उजळणी

श्री तुळजाभवानीची स्तुति आणि तिला प्रार्थना करणाऱ्या त्या ओंव्या, इ. स. १६५६ ते १६६० या काळांत केव्हांतरी रामदासांनीं रचल्या.

या ठिकाणीं विचार होता, कीं 'इ. स. १६५६ ते १६६० हा काळ म्हटला म्हणजे आपल्या अंतःकरणांत कोणकोणत्या गोष्टी दाटतात ?'

असा प्रश्न वाचक बाळगोपाळांना विचारावा. पण अपराधी मन विचारीत आहे,

"हा प्रश्न तुम्ही करतांच कसे ! तुम्ही वडील माणसें मुळांना इतिहास शिकवितां तो आवडीनें शिकवीत नाहीं. तुमचे स्वतःचेच विचार निश्चित नसतात, कीं इतिहासांतल्या कोणत्या गोष्टी मुलांच्या मनांत ठसाव्या, त्यांच्या स्मरणांत सदोदित रहाव्या

आणि त्यांच्या योगें मुलांच्या स्वभावाची जोपासना व्हावी! तुम्ही जर इतिहासाच्या अभ्यासापासून कांहीं अपेक्षा करीतच नाहीं तर परीक्षावजा असे हे प्रश्न विचारण्याचा तुम्हांला अधिकार काय ?"

मनानें विचारलेल्या या प्रश्नापुढें खजिल झालें पाहिजे खरें !

आतां स्वत:साठीं, स्वत:च्याचसमोर उजळणी करतों ती अशी—

इ. स. १६४६–४७ या वर्षी श्री शिवाजीमहाराजांनीं प्रथम रोहिडा किल्ला घेतला, आणि सुराज्यस्थापनेच्या आपल्या अवतारकार्याला आरंभ केला. पुढें लवकरच महाराजांनीं तोरणा किल्ला मिळविला.

आपल्यापैकीं पुष्कळ माणसें म्हणतात,

"तोरणा किल्ला घेऊन शिवाजी महाराजांनीं सुराज्य स्थापनेचें तोरण बांधलें."

हीं माणसें असें कां म्हणतात ? रोहिडा किल्ल्याला तीं विसरतात कां ?' कीं 'तोरणा' आणि 'तोरण' या शब्दांवर जी थोडी कसरत करतां येते त्या कसरतींतल्या समाधानासाठीं तीं असें करतात ?

तुम्ही तुमच्या मित्रांच्यापैकीं कांहीं जणांना विचारून पहा, म्हणजे समजून येईल कीं कांही माणसें खरोखरच रोहिड्याला विसरलेलीं असतात. कांही जणांच्या तर खिजगणतींतहि रोहिडा किल्ला नसतो. पण कांही माणसें जीं मानतात कीं महाराजांनीं तोरणा घेतला तेव्हांच त्यांनीं सुराज्य-स्थापनेचें तोरण बांधलें' तेंहि तीं माणसें सकारण आणि विचारपूर्वक मानीत असतात. कारण, तीं माणसें असें मानतात. तोरणा किल्ला घेतल्या-नंतरच महाराजांनीं—१८ वर्षांचें वय झालें असेल नसेल अशा या अवतारी पुरुषानें—आपली 'मुद्रा' तयार केली कीं—

**प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।**
**शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥**

वाचक बालमित्रांनीं वडिलधाऱ्या माणसांकडून समजून घेतलें पाहिजे, कीं महाराजांनीं आपल्या मुद्रेला कशाची उपमा घेतली आहे; ती मुद्रा 'वर्धिष्णु' आणि 'विश्ववंदिता' आहे म्हणजे कशी आहे; ती 'भद्राय' आहे म्हणजे कशासाठीं आहे आणि ती 'राजते' म्हणजे काय करते. आणि मग

वाचक मुलांमुलींनीं तल्लीन झालें पाहिजे. मराठ्यांना परमेश्वरासारखा असलेला हा प्रतापी पुरुष वयानें पुरा अठरा वर्षांचाहि झाला नव्हता तेव्हांच त्याचें अंतःकरण, शोभा, वर्धिष्णुता, विश्ववंद्यपणा आणि कल्याण यांना पाहिलेलें होतें !

तोरणा किल्ल्यावर डागडुजीसाठीं खणीत असतां महाराजांना अर्चानर्क द्रव्यानें भरलेले हंडे सांपडले. त्या संपत्तीचा उपयोग करून महाराजांनीं राजगड किल्ला बांधला.

पुढें महाराजांनीं कोंडाणा आणि चाकण हे किल्ले मिळविले. ते मिळविण्यासाठीं त्यांनीं कशाचा उपयोग केला ? शरीरबळाचा ? हत्यारांचा ?

नाहीं, कोंडाणा व चाकण हे किल्लेहि जे महाराजांनीं मिळविले ते स्वतःच्या आणि इतरांच्याहि माणुसकीचा, सौजन्याचा, सतेजपणाचा उपयोग करून मिळविले. हे किल्ले ज्या किल्लेदारांच्या स्वाधीन होते त्यांच्या माणुसकीला आवाहन करूनच महाराजांनीं सुराज्य स्थापनेच्या आपल्या कार्यांत त्यांना वांटेकरी बनविलें—आणि प्रत्यय आणून दिला कीं, आपण जें करायला घेतलें आहे तें काय आहे, त्याचा पाया काय आहे आणि त्याची उभारणी व वाढ कशी होणार आहे.

महाराजांचे स्वतःचे मामा संभाजी मोहिते यांनीं याच काळांत, सुराज्यस्थापनेला बाधक असा त्रात्यपणा मांडला; परंतु त्यांचें पारिपत्य महाराजांनीं न्यायनिष्ठुरपणानें केलें. त्यायोगें झालें काय, कीं सर्वसामान्य माणसांच्या मनांत महाराजांविषयीं परमोच्च प्रतीचा आदर उत्पन्न झाला आणि महाराजांच्या न्यायीपणावर सर्वांचा विश्वास बसला; लोकांची खात्री झाली कीं "शिवाजीच्या राज्यांत न्यायाच्या कामांत 'एकाला एक आणि एकाला एक' असें होणार नाहीं."

पुढें महाराजांनीं पुरंदर किल्ला घेतला, तोसुद्धां त्या किल्लेदाराची माणुसकी जागी करूनच मिळविला.

कल्याण खजिना लुटण्याचा बनाव आणखी कांही दिवसांनीं घडला—आणि मराठ्यांच्या अंतःकरणांतून कधींहि अंधुक होतां नयेत अशीं अमर अक्षरें—

मराठ्यांनींच काय, पण जगांतले जे कोणी स्वतःला मनुष्य म्हणवितात, पुरुष म्हणवितात अशा सर्वांनीं आदरानें ऐकावीं आणि आचरणांत आणून आपलींशीं करावीं अशीं अक्षरें—

मराठ्यांच्या महादेवानें उच्चारलीं :

माझी आई या स्त्रीसारखी सुंदर असती तर मीसुद्धां मोठा देखणा झालों असतों !

आणखी कांहीं काळ जात आहे तोंच महाराजांनीं कोंकणपट्टी जिंकली. कल्याणपासून राजापुरापर्यंतच्या मुलुखावर स्वजनांची सत्ता स्थापन केली.

महाराजांच्या अलौकिकपणाची एक ठळक खूण महाराजांनीं याच काळांत पटविली. त्यांनीं मराठ्यांच्या आरमाराची उभारणी केली, आणि पाहतां–पाहतां तें आरमार अरबी समुद्रांत हिंदुस्थान देशाच्या पश्चिम किनाऱ्यावर—अजिंक्य होईल इतकें वाढवून जय्यत तयार ठेवलें. प्रतापगड किल्ला महाराजांनीं बांधला तो याच काळांत; प्रतापगडावर श्री तुळजाभवानीची स्थापनाहि महाराजांनीं याच काळांत केली.

‘ उदंड ऐकिलें होतें—’ या प्रसन्न ओव्या श्री समर्थ रामदासांनीं ज्या काळांत गायिल्या त्या काळाची खरी आणि अधिकांत अधिक ओळख करून घ्यावयाची असेल तर त्या काळींच्या आणखी कित्येक गोष्टी आपण आपल्या मनांत वागविल्या पाहिजेत.

श्रीरामदासांच्या काळापूर्वीं कित्येक वर्षें श्रीज्ञानेश्वर इत्यादि अवतारी पुरुषांनीं महाराष्ट्रांत उद्योग आरंभिला होता, कीं मराठी माणसांच्या माणुसकीला हाका माराव्या आणि तिची शपथ मराठी माणसांना घालावी.

रामदासांच्या ओव्यांचा आणि श्लोकांचा हा काळ साधुश्रेष्ठ तुकाराम-महाराजांचा काळ होता—आणि या संतश्रेष्ठाला साथ देणारे इतरहि अनेक श्रेष्ठ संत, त्या काळांत, आपल्या या मराठी मुलुखांतील माणसांचें मन तयार करीत होते.

ज्या आदरानें, भक्तिभावानें आणि प्रेमानें आपण श्रीतुकाराममहाराजांचें स्मरण करतों त्याच आदरानें, भक्तीनें आणि प्रीतीनें गोरा कुंभार, रोहिदास चांभार, बाबा याकूत, चोखा मेळा महार, सांवता माळी, नरहरी सोनार या या संतांचें आणि कवींचें—आम्हां सर्वांना देवासारखे असलेल्या या मार्गदर्शकांचें स्मरण आपण ठेविलें पाहिजे.

आणि केवळ या संतांचेंच तेवढें स्मरण आपण करूं तर त्यानें भागणार नाहीं.

त्या काळच्या सर्वसामान्य मराठी माणसानांहि आपण स्मरलें पाहिजे. श्री तुकाराम महाराज आणि इतर संत यांच्या कीर्तनांना लोकांची गर्दी जमत असे. दूरदूरचे लोक, पुरुष आणि स्त्रिया, पायीं चालत येत आणि कीर्तनें ऐकायला बसत. तीं कीर्तनें केवळ करमणुकीसाठीं नसत, तर लोकांना बोध देण्यासाठीं, त्याचप्रमाणें धीर देण्यासाठीं असत. गोडगोड सुरांच्या साधनांनीं—तबला, पेटी इत्यादींच्या साधनांनीं कीर्तनाला गोडी आणण्याचे ते दिवस नव्हते. आणि तरीहि त्या कीर्तनांना लोक गर्दीनें येत असत. त्याकाळीं छापखाने नव्हते; पुस्तकेंहि नव्हतीं. पण संतांनी गायिलेले अभंग वा ओव्या—जे अभंग वा ज्या ओव्या कित्येकदां तर, कीर्तन चालू असतां, कीर्तनाच्या रंगांत, कीर्तनकाराला सुचलेलीं असत आणि जशीं सुचलीं तशींच म्हटलेलीं असत—लोक आवडीनें ऐकत असत; त्या कवितांचा अर्थ आणि त्यांतील तळमळ लोकांच्या अंत:करणांना जाऊन भिडत असे; पोथ्यांच्या किंवा पुस्तकांच्या पानांवर आणि पृष्ठांवर जें लिहिलें जावयाचें वा छापलें जावयाचें तें लोकांच्या जिवंत हृदयांवर कोरलें जात असे. ‘ जगावें कसें—माणसें म्हणून जिवंत राहावें कसें ’ हें सांगण्यासाठीं आमचे साधुसंत कीर्तनें करीत असत. तीं कीर्तनें ऐकणारांच्या अंगीं पात्रता असे, कीं ‘ नवीन असें कोणी कांही सांगूं लागला तर तें ऐकून घ्यावें कसें, त्यावर विचार करावा कसा आणि त्यांतलें जें आपल्याला समजेल आणि पटेल तें आचरणांत आणावें कसें,

**भविष्याचा पट पाहतां समोर**
**तयावरती काळोख गर्द घोर**
**अश्रुपटलानें लोचनां दिसेना**
**मतीगतिला ती स्थिती आकळेना**
**तोंच उज्ज्वल चारित्र्य पूर्वजांचें**
**नभीं दिसले हे पुंज तारकांचे**
**तिमिर निवळे मन्मना धीर आला**
**जधीं ध्येयाचा मार्ग काढण्याला**

— तळवलकर

## ४. कीं धुगधुगी आहे ती धगधगीत व्हावी

रोहिडा, तोरणा, कोंडाणा, चाकण आणि पुरंदर हे किल्ले महाराजांनीं घेतले. ते घेतांना कोणाचें रक्त सांडण्याचा प्रसंग महाराजांच्यावर आला नाहीं.

हे किल्ले महाराजांनीं घेतले तेव्हां हे किल्ले तेवढेच महाराजांनीं मिळविले नाहींत; महाराजांनीं मांडलेल्या या महन्मंगल कार्यांत तनमनधन देतील अशीं माणसेंहि महाराजांनीं जोडलीं. माणसें जोडण्याचें हें ईश्वरी काम महाराजांनीं त्यांच्या आयुष्यभर केलें.

'माणसें जोडण्या' साठीं महाराज माणसांशीं समजुतीचीं बोलणीं करीत. हें समजुतीचें बोलणें जें महाराजांना साधलें तें महाराजांच्या अंगीं तसेंच अलौकिक गुण होते म्हणूनच साधलें, हें तर खरेंच. पण त्याबरोबर आपण हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं 'समजुती' चीं हीं 'बोलणीं' महाराजांनीं ज्या लोकांशीं केलीं त्या लोकांच्याहि अंगीं कांहीं समजूतदारपणा असला पाहिजे. महाराजांचा मोठेपणा, त्यांचें मोठें मन, त्यांचे मोठे विचार आणि त्यांच्या मोठ्या आकांक्षा समजून घेण्याची पुष्कळशी पात्रता त्या लोकांच्या अंगीं खास होती. तीं माणसें जातिवंत, जिवंत माणसें होतीं. त्यांना जागीं करण्याचें काम महाराजांनीं केलें. त्या माणसांच्या अंतःकरणांत माणुसकीची जी धुगधुगी होती तिला धगधगीत करणें हें काम महाराजांनीं केलें.

अर्थात् महाराजांच्या अंगीं लोकोत्तर गुण होते म्हणूनच त्यांना हें कठिण काम साधलें. हें काम महाराजांनीं केलें. सुराज्य स्थापनेच्या कामासाठीं लोकांचीं मनें वळविलीं—तेव्हां महाराजांचें वय अगदीं कोवळें—पुरें सोळा वर्षांचेंहि नाहीं; इतकें कोवळें होतें. त्यांच्या हाताशीं असलेलीं साधनें तर अगदींच तुटपुंजीं होतीं. आणि असें असूनहि महाराजांनीं जें कार्य केलें त्याविषयीं विचार करूं लागावें तों मति गुंग होते—आणि अंतःकरण प्रसन्न होतें !

कोंवळ्या वयाचा एक पुरुष—जणूं सोळा वर्षांचें पोरसवदा रूप घेतलेला परमेश्वरच—असंख्य अशा इतर लहान थोर स्त्रीपुरुषांच्या माणुसकीला भावभक्तीनें हाक घालतो, आणि माणुसकीचेंच उत्तर त्या हाकेला हटकून मिळतें, ही गोष्टच अशी आहे, कीं श्री. महादेवशास्त्री जोशी यांच्यासारखे प्रतिभाशाली श्रेष्ठ जेव्हां त्या गोष्टीविषयीं लिहायला किंवा बोलायला बसतात, तेव्हां वृक्षलतादिकांना देखील ते बोलकीं बनवितात !

तोरणा किल्ल्यावरील नांदरुखीचा वृक्षहि श्री. महादेवशास्त्र्यांनीं असाच बोलता बनविला आहे ! श्री शिवाजी महाराजांनीं तोरण्याच्या किल्लेदाराचें मन कसें वळविलें, आणि आणखी कांही ठिकाणींहि महाराजांना ही 'किमया' कशामुळें साधत गेली तें त्या वृक्षानें शास्त्रीबुवांना सांगितलें तें असें:

"तुला ठाऊक असेल, कीं १६४६ त शिवप्रभूनें याच संस्थानांतल्या रोहिडखोऱ्यांतला रोहिडा किल्ला प्रथम घेतला आणि नंतर थोड्याच दिवसांत हा प्रचंड गडहि आपलासा केला. शिवराय युक्तिप्रयुक्तीनें बऱ्याच गोष्टी साधी, आणि जरूर तिथेंच शस्त्रबळाचा अवलंब करी. या किल्ल्याचा कब्जा करतांना त्याला खड्ग उपसावें लागलें नाहीं अथवा कोणाचें रक्तहि सांडावें लागलें नाहीं. एके दिवशीं तिन्हीसांजा तो घोड्यावर स्वार होऊन आपल्या चार अनुयायांसह गडाच्या पायथ्याशीं आला. ती सूचना मिळतांच वरून किल्लेदार खालीं उतरला. त्या रात्रीं त्यांचीं काय हितगुजें झालीं आणि कोणतीं स्फुरणें किलदाराच्या हृदयांत शिरलीं न कळे, पण सकाळीं तो वर चढला आणि त्यानें विजापुरकरांचें निशाण बेदरकारपणें खालीं उतरवून त्या जागीं शिवाजीचा झेंडा फडकवला !

नंतर शिवाजी इतमामानें वर आला; किल्ल्याचा धनी म्हणून आला !

या गडाचा तट ठायीं ठायीं ढासळला होता, तो दुरुस्त करायला त्यानें लगेच सुरवात केली. खणतां खणतां एका जागीं भूमिगत ठेवा सांपडला. मोजून संपणार नाहीं इतका गडगंज. एखाद्या कुळाला उत्कर्षकाल आला, कीं आदित्याच्या कहाणींत वर्णिल्याप्रमाणें, लक्ष्मी चारी वाटांनीं तिथें धांवत येते आणि घर भरून दार ओतूं लागतें !

शिवबा, शक्तियुक्तीचा धुरंधर, तसाच दवाचा शिकंदर. इथल्याप्रमाणें कल्याणचा कोट बांधतांनाहि त्याला अपार निधान सांपडलें. प्रधानगड जिंकून घेतल्यावरहि तोच प्रकार! वर चढतांना वाटेंत बोरीची कांटी पालखीस लागली. तेव्हां महाराज बोलले, 'काय निमित्त कांटी अटकावते? खालीं खणावें.' खणल्यावर बावीस घागरी व चार कढया मोहरा, होन, सोन्याच्या कांबी यांनीं भरलेल्या सांपडल्या!

आणि मग काय! लोकांची भावना एकदम पालटली. शिवराज एकदम अवतारी पुरुष ठरला! संशयी होते तेहि अनुकूल झाले. अनुयायांचीं मस्तकें भक्तिभावानें नमलीं. व्यवहारांतले 'मोरावळे' त्याला उच्छृंखल म्हणत असत; ती भाषा एकदम बंद पडली. सह्याद्रींत आणि घाटमाथ्यावर असणाऱ्या जाती-जमातींनीं त्याच्या नेतृत्वाला निस्संदेह मान्यता दिली. त्याच्याशीं अंगेंप्राणें सहकार्य केलें. स्वराज्याची–मराठ्यांच्या राज्याची–प्रेरणा सह्याद्रीच्या दऱ्यादरकुट्यांत नादमय, घोषमय झाली."

—महाराष्ट्राचीं धारातीर्थें.

## ५. चिथावणी नव्हे ! लोकजागृति—

आपण वर म्हटलें आहे, कीं 'श्रीशिवाजीमहाराजांनीं मोठ्या मानानें मारलेल्या हांकेला धावून जाण्याची तयारी त्या काळच्या लोकांत होती.' आणि हा वृक्षराज तर म्हणतो, कीं त्या काळीं 'कोणी संशयी होते' आणि 'कोणी मोरावळे असे होते कीं जे महाराजांना उच्छृंखल म्हणत.'

अर्थात् वृक्षराज कांही खोटें बोलला नाहीं ! एकतर असें, कीं समाज म्हटला म्हणजे त्यांत कोणी 'संशयी' तर कोणीं 'व्यवहारांतले मोरावळे' असायचेच ! आणि हे 'मोरावळे' तरी कशाचे बनतात ? परिस्थितीच्या प्रभावानें, कांही दुर्बल 'मोरावळे' बनतात. त्याकाळीं जी परिस्थिति होती—शिवभूपतींनीं सुराज्य—स्थापनेचा मांड घालण्यापूर्वी जी परिस्थिति होती तिचें आणखी एक अंग होतें. हें अंग पहायचें म्हटलें तर—श्रीसमर्थरामदासांच्याच शब्दांत—तें असें पहायला मिळतें :

**पदार्थ मात्र तितुका गेला। नुसता देशचि उरला। येणें करितां बहुतांला संकट जालें ॥ १ ॥ लोकें स्थानभ्रष्ट जालीं। कितेक तेथेंचि मेलीं। उरलीं ते मराया आलीं। गांवावरी ॥ २ ॥ माणसां खावया धान्य नाहीं। आंथरुण पांघरुण तेंहि नाहीं। घर कराया सामग्री नाहीं। काये करिती ॥ ३ ॥ पुढें आला पर्जन्य काळ। धान्य महर्ग दुष्काळ। शाकार नाहीं भळभळ। रिचवे पाणी ॥ ४ ॥ कितेक अनाचारीं पडिलीं। कितेक यातिभ्रष्ट जालीं। कित्येक तीं आक्रन्दलीं। मुलेंबाळें ॥ ५ ॥ कितेक विषें घेतलीं। कितेक जळीं बुडालीं। जाळिलीं वा पुरिलीं। किती येक ॥ ६ ॥ ऐसें जालें वर्तमान। पुढेंहि अवघा अनमान। सदा दुश्चीत अवघे जन। उद्वेगरूपीं ॥ ७ ॥ कांहींच पाहतां घड नाहीं। विचार सुचेना कांही। अखंड चिंतेचिया प्रवाहीं। पडिले लोक ॥ ८ ॥ येक म्हणती कोठें जावें। येक म्हणती काय करावें। विदेशा जाउनी काय खावें। वेच नाहीं ॥ ९ ॥ तथापि मार्गचि चालेना। भिक्षा मागतां मिळेना। अवघे भिकारी जना। काये म्हणावें ॥ १० ॥ प्राणिमात्र जाले दुःखी। पाहातां कोणही नाहीं सुखी। कठिण काळें ओळखी। धरीनात कोणी ॥ ११ ॥**

'पदार्थ' असें जें या ओव्यांत म्हटलें आहे तें काय? 'पदार्थ मात्र' जो गेला तो कसा आणि कोणीकडे गेला! लोक 'गांवावरी' आले म्हणजे कुठें आले? सदाचार, जात व कुलधर्म यांच्याविषयीं सर्वसामान्य माणसांना जें अगत्य वाटतें तें अगत्य, आणि त्या सर्वसामान्य माणसांची सुखी वा दुःखी स्थिति, यांत, रामदासांच्या मतें, परस्पर काय संबंध दिसतो? कष्टांची परमावधि झाली म्हणजे माणसें केवळ 'संशयी' बनलीं तर त्याचे काय काय भयंकर परिणाम होतील?

वरील ओव्यांत श्रीरामदासांनीं जी परिस्थिति वर्णिली आहे तिला 'स्फोटक' असें विशेषण आपण आजकाल वापरतों.

या परिस्थितींत माणसांचीं मनें 'पेट घ्यायला' तयार असतात. माणसांचीं मनें अशीं 'बिघडलेलीं' असतात तेव्हां त्या माणसांना चिथावणी देणें सोपें असतें. पण लोकांना 'चिथावणी देणें' आणि लोकांत 'जागृति' करणें या दोन गोष्टी अगदीं भिन्न आहेत. नव्हे—त्या परस्परविरोधी आहेत. जागृतीनें माणुसकीची संभावना होते; माणुसकी वाढीला लागते. चिथावणी म्हणजे माणुसकीचा अपमान–तिची विटंबना आहे. चिथावणी ही माणुसकीच्या 'मुळावर' येते!

तख्तें रक्तप्रवाह वाहवुनि या भूमीवरीं स्थापिलीं
झाली दुर्बल ही अशेष जनता, दुःखीं धरा व्यापिली;
तेव्हां फुंकित दिव्य शिंग अपुलें आलास धीरा! पुढें—
झाले जागृत हे अचेतन तरी सह्याचलाचे कडे!
आले धांवत हाक ऐकुनि तुझी अज्ञान हे मावळे
निष्ठा आणिक त्याग हींच अवघीं शस्त्रें जयांचीं बळें!
'राहो देश स्वतंत्र नित्य आपुला' ही स्फूर्ति त्यांच्या मनीं
राया! संचरली तुझीच श्रवुनी वाणी सुधास्यंदिनी!

—माडखोलकर

## ६. त्यांचा मुदा मनास आणविणें—

महाराजांनीं हा कार्यारंभ केला तेव्हां परिस्थिति जरी अशी ‘ स्फोटक ’ होती तरी माणसांचीं मनें वळविण्याचे महाराजांचे प्रयत्न कसे माणुसकीचे आणि मोठेपणाचे असत तें आपण या उताऱ्यांत पाहूं या.

“ त्यावरी राजेश्री स्वामींनीं हुकूम केला, कीं वरकड मावळचे देशमुख व तुम्ही येक जागां बैसोन त्यांचा मुदा मनास आणवणें. त्यावरी कान्होजी नाईक व अवघे मावळचे देशमुख येके जागां बैसले. तेव्हां अवघे देशमुख बोलिले, कीं तुमचा विचार काय तो सांगणें. तेव्हां बोलिले, कीं आम्हीं राजेश्री स्वामींच्या पायाशीं इमान धरून वतनास देखील पाणी सोडिलें. आम्ही व आपले लेकदेखील राजेश्री स्वामींपुढें खस्त होवे येसा आमचा विचार आहे. तुमचा मुदा काय तो बोलणें. मुसलमाम बेइमान आहे. कार्य जालियावरी नसतें निमित्य ठेवून नाश करील. हें मऱ्हाष्टराज्य आहे. अवघियांनीं हिम्मत धरून, जमाव घेऊन, राजेश्री स्वामींसन्निध राहोन, येक निष्ठेनें, शेवा करावी. यैशा हिमतीच्या गोष्टी सांगितल्या. तेव्हां अवघे देशमुख बोलिले, कीं तुमचा विचार तोच आमचा विचार इमानपुरस्कर आहे. यैसे बोलिले तेव्हां अवघे देशमुख घेऊन राजेश्री स्वामीसन्निध आले. अवघ्यांनीं शपथ केली. मग अवघियांसी भोजनास घातलें. त्यावरी अगदीं मावलचा जमाव केला.”

या उताऱ्याबाबत आपण ‘ विचार ’ केला पाहिजे तो असा :

कोणाचेंहि मन वळविण्याचा प्रयत्न जेव्हां महाराज करीत तेव्हां त्यांचा मुद्दा मनास आणवणें, **त्यांचें म्हणणें काय आहे तें समजून घेणें** ही त्या मतपरिवर्तनांतली पहिली पायरी असे—आणि त्यासाठीं **येके जागां बैसणें** अत्यावश्यक आहे हें महाराज जाणून होते. महाराजांचे सहकारी जाणून होते, कीं महाराजांच्या प्रयत्नांना साथ द्यायची म्हणजे **वतनास पाणी सोडणें** आहे; शिवाय त्यांचा निर्धारहि होता, कीं ‘ स्वामींच्या पुढें आम्ही व आमचे लेकदेखील स्वस्त होवे. ’ या उताऱ्यांत आलेला ‘ मुसलमान ’ हा शब्द ‘ जात ’ किंवा ‘ धर्म ’ सांगणारा नाहीं; ‘ जुलमी राज्यकर्ता ’ अशा अर्थानें तो वापरलेला आहे. महाराजांच्या भाग्यशाली सहकाऱ्यांना पूर्ण कल्पना होती, कीं महाराजांच्या नेतृत्वाखाली जें कार्य करायला आपण निघालों आहों तें कार्य असेंतसें आणि एवढेंतेवढें नाहीं; तें काम म्हणजे ‘ मऱ्हाष्टराज्या ’ ची स्थापना करणें

हें आहे. त्या भाग्यवान लोकांना हीसुद्धां जाणीव होती, कीं **सुराज्य स्थापनेचें** हें कार्य सिद्धीला जाण्यासाठीं ' अवघियांची हिम्मत ' आवश्यक आहे; ' जमाव आवश्यक आहे; महाराजांचें नेतृत्व आवश्यक आहे आणि निष्ठा आवश्यक आहे. '

**सामान्य जीवांस जें साधतें कांहि त्याहूनही दिव्य दावी जनां**
**अल्पांत संतुष्ट ही वृत्ति त्याची न मोठेपणाची स्पृहा त्या मना ॥**
**युक्ति प्रयुक्ति प्रभावें करूनी स्वराज्यप्रभा पाहणें ध्यास हा**
**जाणोनियां वेळ राष्ट्रामध्यें खेळ खेळे शिवाजी असा हा पहा ॥ १ ॥**

**ज्या ज्या कलांचे धनी लाधले योग्य त्या त्या जनां संग्रहीं ठेवुनी**
**स्थापावया आत्मसत्ता स्वदेशांत व्हाया पुरे मुक्त दास्यांतुनी ॥**
**जें जें नवें शस्त्र जें जें नवें तत्त्व रक्षावया राष्ट्र लाधे महा**
**तें तें बळें मेळवी दुर्ग घे शत्रु जिंकीत राजा शिवाजी पहा ॥ २ ॥**

**धर्मार्थ देशार्थ आयुष्य खर्चूनि शत्रूंसि दावी ' अमीरी ' प्रभा**
**राजा शिवाजी विराजे महाराष्ट्रिं दैदीप्य तो अंशुमाळी नभा ॥**
**भक्तांमध्यें भक्त, धीरांमध्यें धीर, वीरांमध्यें वीर, दाता महा**
**ज्याची ' अमीरी ' जगा लाजवी होय राजा शिवाजी असा हा पहा ॥ ३ ॥**

—वसंत विहार

# ७. आदराचें आणि पराक्रमाचें बोलणें

सुराज्यस्थापनेचे जे विचार शिवाजीमहाराजांच्या मनांत येत, आणि त्यांबाबत आपल्या इष्टमित्रांशीं महाराज जो ऊहापोह करीत त्यांचें स्वरूप काय असे ? या प्रश्नाचें एक उत्तर आपण वाचलें. याच प्रश्नाचें आणखी एक उत्तर आपण आतां वाचूं. **मल्हार रामराव चिटणीस,** ज्यांनीं महाराजांचें चरित्र लिहिलें आहे, ते या प्रश्नाचें उत्तर असें देतात :

" या समयीं महाराजांनीं विचार केला जे, ' वडिलांनीं मेळविलें तें खाऊन राहणें आपल्याला योग्य नाहीं. आपण हिंदू. सर्व दक्षण देश म्लेंच्छांनीं ग्रासिला. देवब्राह्मणगायींस, क्षेत्रांस पीडा केली. धर्म बुडविला. हा रक्षणार्थ प्राणहि वेचून धर्म रक्षूं , व आपले पराक्रमानें नवीन दौलत संपादूं, **तें अन्न**

भक्षूं. नवें साधावें हें या कुळांत जन्मल्याचें सार्थक. दैवावर भार घालूं. पुरुष प्रयत्न बलवत्तर अधिक होय. दैव पंगू आहे यास्तव प्रयत्न अलबत करावे. त्यास दैव जसजसे सहाय होईल तसतसें अधिक करीत जावें. परिणामास नेणार देव समर्थ आहे.' याप्रकारें मनांत पूर्वजन्मांतर योगें आणून निश्चय करते झाले, कीं 'वय व्यर्थ घालवणें नीट नव्हे.'

ही सल्ला दादोजी कोंडदेव यांस विचारली. त्यांनीं, "आपण म्हणतां परंतु याचा शेवट लागणें परम दुर्घट आहे. सर्व पृथ्वी यवनांनीं पादाक्रांत केली. स्थळें, किल्ले, जागा फौज त्यांची भरली. या कारणास आपणांस मातबर स्थळें असावीं. हिंदु राजे व हिंदु फौजा जागां जागां साहाय्यकर्त्या असाव्या. आपण परम श्रमसाहसांनीं दुष्कर कर्म करावें, त्या समयीं ईश्वराचीं अनुकूलता व सिद्ध पुरुषांचा आशीर्वाद असतां अशा गोष्टी घडतील. साहेब मनांत आणितात हें कठिण. वडिलें यवनांची सेवा करून, योग्यता मिळवून, दौलत संपादन केली. याचा विचार म्हणतां तरी हें युग विपरीत. तेव्हां दिवसेंदिवस धर्म क्षयास जाणार. तेव्हां हें घडणें दुरासाद. काल-देश-वर्तमान तिहींकरून मनसब्यास येत नाहीं. 'वडिलीं दौलत संपादिली ती गमाविली' 'हें वाट्यास न यावें', अशा प्रकारें सांगितलें असतां महाराजांनीं—

मसलत करण्याचे गुण सांगितले तितके मात्र चित्तांत घेऊन दोष ठेविले नाहींत. 'उपेक्षा करणें ठीक नाहीं. आपण चित्तांत आणिलें तैसें करावें. धर्म वृद्धिंगत करण्यासाठीं प्राण, दौलत गेली तरी जावो. प्रयत्न करावा' हेंच मनःपूर्वक आणून पहिले दौलतींतलीं माणसें, संक्राजी निळकंठ, व बाळकृष्ण मुजुमदार, व सोनोपंत रघुनाथ बल्लाळ कोरडे, शिवाय सरदार वगैरे ममतेंत मसलतींत येतील त्याप्रमाणें घेऊन, आणखी चांगले मर्द शिपाई ठेवावे असें करूं लागले. तशींच राजकारणें करावीं; मातबर चहूं जागचे मराठे यांसी आप्तपणा करावा; पत्रें लिहावीं; त्यांस आणून भेट घ्यावी. आपण त्यांचेकडे जाऊन, 'आम्हांस अनुकूल असावें' असें बोलावें. असें करण्यांत ज्यांनीं महाराजांचें बोलणें परम आदराचें व पराक्रमाचें ऐकावें त्यांस वेध लागून वाटावें, कीं 'हे परम थोर होत; यांचेच सम्मतें चालावें; हे सांगतील तसें वागावें.' अशीं सर्वांचीं चित्तें वेधून घेतलीं. शके १५६९ यांत या मसलतीचा आरंभ करिते झाले."

महाराजांनीं या मसलतीचा आरंभ केला तेव्हां—म्हणजे इ. स. १६४६ सालीं महाराज किती वयाचे होते ? या पुस्तकांत, ठिकठिकाणीं, हिंदु हा शब्द जो आलेला आहे त्याचा अर्थ **अमुक एका धर्माचे अनुयायी** असा घेणें योग्य होणार नाहीं. **जनता, बहुजनसमाज** हे शब्द आपण आजकाल ज्या अर्थानें वापरतों तोच अर्थ या पुस्तकांत आलेल्या **हिंदु** या शब्दाचा घेणें सयुक्तिक होईल. सुराज्यस्थापनेचें हें थोर उद्दिष्ट महाराज ज्यांच्या वतीनें आणि ज्यांच्या हातून साध्य करणार होते ते नुसते 'हिंदु' नव्हते; ते नुसते 'मराठे' नव्हते—ते 'दक्षणचे ( दक्षिण देशाचे, महाराष्ट्राचे ) लोक' होते. **धर्म** या शब्दाच्या अर्थाबाबतहि असाच विचार केलेला बरा. 'आचारा-विचारांचें आणि सुखी व समाधानी राहण्याचें स्वातंत्र्य म्हणजे **धर्म**' असा या पुस्तकांत आलेल्या **धर्म** या शब्दाचा अर्थ केला पाहिजे. देव, ब्राह्मण, गायी आणि क्षेत्रें यांचे जे उल्लेख या पुस्तकांत आले आहेत तेहि असेंच, खास अर्थाचे, समजून वाचले पाहिजेत.

वयाच्या १६।१७ व्या वर्षीं महाराज व्रत घेत होते :

'आपल्या पराक्रमानें नवीन दौलत संपादूं; तें अन्न भक्षूं'. महाराजांनीं घेतलेल्या या व्रतांत सर्वसामान्य माणसाला कोणता धीर मिळण्यासारखा होता ( आणि आजसुद्धां मिळण्यासारखा आहे ) ?

महाराज म्हणतात : 'दैवावर भार घालूं.' आपण बरेचसे लोकहि ( कळत—न कळत ) दैवावर भार घालून असतों. आपण दैवावर घातलेला भार आणि महाराजांनीं दैवावर घालण्यासाठीं योजिलेला भार यांत अंतर काय ? 'पुरुष-प्रयत्नां'ना परिणामास नेण्याची जबाबदारी कोणावर आहे असें महाराज म्हणतात ? 'दैवावर भार घालणें' आणि 'देवावर भार घालणें' यांत अंतर काय ? हे थोर विचार महाराजांना सुचले, आणि 'वय व्यर्थ घालवणें नीट नव्हे' असा निश्चय महाराजांनीं केला, तो कशाच्या योगें असें चरित्रकार चिटणीस म्हणतात ? असे हे थोर विचार अनेकांना सुचावे यासाठीं कोणाकोणाला काय काय करतां येईल ? दादोजी कोंडदेवांच्या तोंडीं, यवनांच्या बलाविषयीं कोणती अतिशयोक्ति आली आहे ? ही अतिशयोक्ति कशाचें लक्षण आहे ? साहस करायचेंच म्हटलें म्हणजे माणसानें प्रथम कोणती तरतूद केली पाहिजे ? 'मनसुबा' करतांना कोणत्या तीन गोष्टी लक्षांत घेतल्या पाहिजेत ? दादोजी कोंडदेवांच्या उपदेशांतील कोणता भाग महाराजांच्या बेतांना गुणकारक होता ? त्या उपदेशांतील बाकीच्या भागाबाबत महाराजांचा निर्धार काय होता ? महाराजांच्या महात्मतेंत 'ममता' आणि 'मसलत' यांचें 'प्रमाण' काय होतें ? महाराजांनीं कोणतीं 'राजकारणें' चालू केलीं ? 'धर्म रक्षणें' व 'नवी दौलत संपादणें' यांचे कोणते व्यापक अर्थ महा-

राजांच्या अंतःकरणांत होते ? या दोहोंचे अर्थ व्यापक झाले म्हणजे हीं दोन्हीं कशीं एक होतात ? 'ईश्वराची अनुकूलता व सिद्धपुरुषांचा आशीर्वाद' यांचा जो उल्लेख दादोजी कोंडदेवांनीं केला, तो महाराजांच्या मनसुब्याला मोडता घालण्यासाठीं, कीं 'तूं चाल पुढें तुला रे गड्या भीति कशाची ?' असा आशीर्वाद देण्यासाठीं ? 'साहेब मनांत आणितात तें कठिण' असें दादोजी म्हणाले; 'तें अशक्य आहे' असें ते कां म्हणाले नाहींत ? कशाची उपेक्षा करायची नाहीं असें महाराजांनीं ठरविलें ? महाराजांच्या ममतेंत आलेल्या ज्या श्रेष्ठांचीं नांवें या उताऱ्यांत आहेत त्या नांवांवरून आपण काय बोध घ्यायचा ? 'वेध लागून वाटावें' म्हणजे काय ? 'वेध' न लागतां जें वाटतें तें 'वाटणें' कसें असतें ?

## ८. अवहेलना, आमिषें आणि धमक्या

सोळा वर्षांचें वय असेल-नसेल असे श्री शिवाजीमहाराज सह्याद्रींत रानोमाळ फिरत होते आणि सहृदय अशा जातिवंत आणि जिवंत माणसांच्या उदार अंतःकरणांचा ठाव घेत होते. हृदयांचा हा ठाव घेण्यासाठीं महाराज जें बोलणें बोलत होते तें बोलणें 'आदराचें आणि पराक्रमाचें' असे. सोळा वर्षें वयाच्या या मुलाला पाहून जातिवंत आणि जिवंत अशीं माणसें आपला अहंभाव विसरत होतीं. प्रौढ आणि वयस्क माणसें, कर्तबगार ठरलेलीं माणसें, मानमरातब उपभोगीत असलेलीं माणसें प्रांजलपणें, लीनपणें, आनंदानें म्हणत होतीं, 'हे परम थोर होत; यांचेंचि सम्मतें चालावें; हे सांगतील तसें वागावें—'

हिम्मत धरण्याचें, जमाव करण्याचें, निष्ठेचें असें हें बोलणें जेव्हां महाराज या मराठे मंडळीशीं बोलत तेव्हां महाराज आशेनें आणि विश्वासानें बोलत. सर्वसामान्य मराठी माणसांच्या बाबतींत महाराजांनीं मनांत बाळगलेल्या त्या आशा आणि ते विश्वास बव्हंशीं सफल संपूर्ण होत असत—आणि लोकांचा निर्धार होत असे, कीं 'स्वामींचे पायांशीं इमान धरून वतनास देखील पाणी सोडावें; आम्ही व आमचे लेक देखील स्वामींपुढें खस्त होवे—'

युगप्रवर्तक अशा या अवतारी पुरुषाचें नेतृत्व अशा रीतीनें निस्संदेहपणें मान्य करून सह्याद्रींतील आणि घाटमाथ्यावरील जाती-जमाती धन्य

होऊं लागल्या होत्या. महाराजांनीं दिलेली मराठ्यांच्या राज्याची—सुराज्याची—प्रेरणा सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत, 'नादमय, घोषमय आणि क्रियाप्रवण' झाली होती.

महाराजांनीं जनतेला ही प्रेरणा देण्याचें कारणच अस होत, कीं त्या काळीं जें राज्य होतें तें जनतेच्या ज़िवावर जगणाऱ्या जुलुमी सत्ताधाऱ्यांचें होतें. भाग्यहीन अशा या लोकांच्या दृष्टीला महाराज कसे दिसले असतील ?

'वरकड मावळचे देशमुख' यांचा 'मुदा मनास आणविण्या' साठीं ज्या कान्होजी जेध्यांची योजना श्रीमन्महाराजांनीं केली होती, त्याच कान्होजी जेध्यांना, विजापूरच्या अलि अदिलशहानें असा 'हुकूम' केला होता :

"शिवाजीनें अविचारानें व अज्ञानानें निजामशाही कोंकणांतील मुसलमानांना त्रास देऊन, लूट करून, पादशाही मुलुखांतील कित्येक किल्ले हस्तगत केले आहेत यास्तव त्याचे पराभवार्थ....अफझलखान महमदशाही यांस तिकडील सुभेदारी देऊन नेमून पाठविले आहेत. तरी खान मजकूर यांचे रजामंदींत व ताबेदारींत राहून....शिवाजीचा पराभव करून निर्मूळ फडशा करावा. शिवाजीचे निसबतीचे लोकांस आश्रय न देतां ठार मारून या दौलतीचें कल्याण इच्छिणें. खानाच्या सांगण्यावरून....तुमची योग्यता वाढविली जाईल. त्याचे सांगण्याप्रमाणें वागावें. तसें न केल्यास परिणाम चांगला होणार नाहीं हें जाणोन या सरकारी आज्ञेप्रमाणें चालावें. तेरीख....हुजूरची परवानगी झाली असे."

'आदर', 'पराक्रम', 'हिम्मत' असल्या मानवी गुणांची, नव्हे–या ईश्वरी शक्तींची कितीशी ओळख आणि पर्वा या हुकुमांत आहे ?

खरोखर 'अविचारी' आणि 'अज्ञानी' कोण होता ? श्री शिवाजी महाराजांनीं निजामशाही कोंकणांतील 'मुसल्मानांना त्रास दिला होता' म्हणजे काय केलें होतें ? राज्यकर्त्या इसमानें—बादशहानें–हे खोटे आरोप कां करावे ?

'ठार मारा' ही भाषा बादशहाच्या लेखणीला शोभते ? कसल्या माणसांच्या मुखांतून वा लेखण्यांतून असली भाषा उमटते ?

कान्होजी जेधे यांच्यासारख्या एका मातबर मराठा सरदाराला लिहितांना 'मुसलमानांना त्रास' असे शब्द खुद्द पादशहानें योजिले आहेत यावरून त्याकाळची मातबर मराठे मंडळी व खुद्द पातशहा यांच्याविषयीं आपण काय अनुमानें बांधावीं ?

या 'पादशाही' हुकुमामध्यें 'आमिषें' आहेत, आणि 'धमक्या' सुद्धां आहेत; पण या पादशाही हुकुमांत असें काय नाहीं कीं जें महाराजांच्या आदेशांत ओतप्रोत आहे ?

## ९. आंगें अर्ज करण्याची गौरवशाली परंपरा—

श्री शिवाजी महाराजांनीं निदिध्यास घेतला होता, आणि ते अहर्निश प्रयत्न करीत होते, कीं जुलुमी सत्तेविरुद्ध सर्वसामान्य माणसानें सारखें झगडावें; त्या झगडण्यासाठीं 'हिम्मत धरून जमाव घ्यावा.'

ज्या जुलुमी सत्तेविरुद्ध सर्वसामान्य माणसानें उठावें असा प्रयत्न श्रीमन्महाराज करीत होते, ती सत्ता म्हणत होती, कीं अवहेलना करावी, आमिषें दाखवावीं, प्रसंगी धमक्याहि द्याव्या आणि महाराजांचा फडशा पाडावा !

पण जे आमिषांना बळी पडले नाहींत, किंवा धमक्यांनीं दबले नाहींत; ज्यांची माणुसकी खडबडून जागी झाली आहे आणि त्या माणुसकीच्या पाइकीपोटीं कांहीं पराक्रम करावा अशी ओढ ज्यांच्या अंतःकरणांना लागलेली आहे अशा पुरुषांचा तोटा या महाराष्ट्रभूमींत केव्हांहि पडलेला नाहीं; श्री शिवाजीमहाराजांच्या वेळींहि तो तोटा नव्हता.

हिंदुस्थान देशाच्या इतिहासांत कोणाहि हिंदी राजाला कराव्या लागल्या नव्हत्या अशा कित्येक तजविजी श्रीशिवाजी महाराजांना पडत होत्या— आणि त्या तजविजी करण्यासाठीं, अडचणीं निवारण्यासाठीं, त्या कामांत जिवावरचीं जोखिमें पत्करण्यासाठीं, कित्येक पराक्रमी पुरुष 'आंगें अर्ज' करीत होते, ते असे :

'....पुढें राजियांस राजपुरीचा शिद्दी घरांत जैसा उंदीर तैसा शत्रु, यास कैसें जेर करावें म्हणून तजविज पडली. तेव्हां रघुनाथ बल्लाळ सबनीस यांनीं आंगें अर्ज केला, कीं आपण शिद्दीवर स्वारी करतों. असें म्हणून सात-पांच हजार मावळे खलक पाईचे घेऊन राजपुरीवरी चालिले. त्यांनीं जाऊन राजपुरीपावेतों तळें घोसाळें कुल देश मारून राजपुरीपावेतों सरद ( सर्व ? )

दरिया किनारा मोकळा केला. शिद्दीच्या एक दोन फौजा आल्या त्या मारिल्या. तेव्हां राजपुरीकडून रघुनाथपंतांशीं राजकारण करून सल्ला केला. देश थोडा बहुत मागून, पुढें सज्जन मनुष्य पाठवून, आणशफत देऊन, रघुनाथपंतांस भेटीस नेलें. भेट जाहली. सत्याची बळकटी करून सख्य झालें. रघुनाथपंतांस वस्त्रें, घोडा दिधला. आपले देशास आले. पुढें काळानुसार रघुनाथपंत मृत्यु पावले. त्यानंतर शिद्दीचें शैल तुटलें. यावरि हाबशियांनीं बदल खावून देशास उपद्रव करूं लागले.

त्यास राजियांनीं जहाजें पाणियांतील सजिलीं. गुराबा व तरांडीं व तारवें, गलबतें, शिबाडें, गुराबा, पगार अशीं नाना जातींचीं जहाजें करून, दर्यासारंग म्हणोन मुसलमान सुभेदार व मायनाईक म्हणोन भंडारी असे दोघे सुभेदार करून, दोनशें जहाजें एक सुभा, असें आरमार सजलें. त्यास व शिद्दीचे जहाजांस युद्ध होऊन शिद्दीचीं जहाजें पाडाव केलीं. युद्ध बहुत जाहलें. दर्यांत तरांडें फिरेना असें जालें. त्यावर हमेशा युद्ध करीत चाललें. मग चोरून मारून हबशी सामान नेत होता. राजियाचीं जहाजें व जागां जागां बंदरें शहरें मोंगलाई व फिरंगी व वलंदेज, व इंग्रज ऐशा सत्तावीस पातशाह्या पाणियांत आहेत त्यांचीं शहरें बेदनूर, सोदें श्रीरंगपट्टण ऐशीं दर्याकिनारे नाना शहरें मारून पोट भरीत चालले. जागां जागां युद्ध करीत, मालमत्ता मेळवून, आपलें पोट भरून राजियांस रसद द्रव्यें जिन्नस आणून देऊं लागले. ये रीतीनें सातशें जहाजें पाण्यांतील झालीं. समुद्रामध्येंहि एक लष्कर झालें. हा एक बेत सजिला. पाण्यांतील एक राजपुरी निजामशाही उरली.'

घरांत माजलेले उंदीर कसा आणि किती प्रकारचा उपद्रव करतात ?

शिद्दी याला दिलेली उपमा कशी समर्पक आहे ?

या छोट्याशा उताऱ्यांतहि मराठी सज्जनपणाची आणि सौजन्याची खूण कुठें आणि कशी पटते आहे ?

मराठी माणसें नेहेमीं सत्याभिमुख आहेत आणि सत्याभिमुखच राहाणार आहेत याची कोणती खूण या उताऱ्यांत आहे ?

रघुनाथपंत मृत्यु पावतांच शिद्दीचें शैली तुटलें यावरून कोणीं काय अनुमान करावें, आणि कोणी काय बोध घ्यावा ?

शिद्दीचें बळ कशांत आहे हें श्री शिवाजी महाराजांनीं कसें ओळखलें ? हिंदुस्थानांतल्या दुसऱ्या कोणाहि राजानें ही गोष्ट ओळखिलेली नव्हती; श्रीशिवरायांनीं ती ओळखली यांतील इंगित काय ?

मराठ्यांच्या श्री शिवाजी महाराजांच्या आरमारावर सर्वश्रेष्ठ अधिकारी कोण होते ? 'दर्यासारंग' यांच्या नेमणुकीनें कोणत्या दुष्टपणाला उत्तर मिळालें ? श्री शिवाजी महाराजांच्या अमदानींत फंदफितुरीचे प्रकार फारसे झाले नाहींत, आणि त्यांतल्या त्यांत मुसलमान बांधव तर त्या प्रकारांपासून पूर्णपणें अलिप्त होते यावरून कोणीहि काय ओळखावें ?

मराठ्यांच्या आरमाराच्या पराक्रमाचा कोणकोणता तपशील या उताऱ्यांत वाचायला मिळतो ?

राजपुरी ( दंडा राजपुरी ) ही कोठें आहे ?

## १०. बलात्कार सर्वथैव न करावा

महाराजांनीं बांधलेले किल्ले पहा; ते जेव्हां बांधले गेले तेव्हां ते इतके मजबूत बांधले गेले, कीं त्या काळीं ते अभेद्य व अजिंक्य होते. आजहि ते अजस्त्र आहेत. अजस्त्र व अजेय असे हे किल्ले महाराजांनीं हां हां म्हणतां बांधले होते. हें कसें काय शक्य झालें असेल ?

महाराजांनीं उभारलेल्या आरमाराची गोष्टहि तशीच. सातशें जहाजांचें बलाढ्य आरमार—ज्या आरमाराच्या सामर्थ्यासमोर मोंगलाई, फिरंगी, वलंदेज, इंग्रज (आणि इतर कित्येक) पातशाह्यांच्या आरमारांची स्थिति, 'दर्यांत तरांडें फिरेना' अशी होती तें आरमार–महाराजांनीं हां हां म्हणतांच उभारलें होतें. हें सुद्धां कसें शक्य झालें असेल ?

वरवर विचार केला तर वाटेल कीं महाराजांनीं साधलेल्या या गोष्टी केवळ अतर्क्य–सादर आश्चर्यचकित करणाऱ्या–आहेत. पण कांहीं गोष्टी जाणून घेतल्या, आणि कांहीं विचार केला, म्हणजे दिसून येतें आणि त्या 'दर्शनानें' परमावधीचें सुख होतें, कीं मानवतेच्या ठिकाणीं महाराजांनीं

अचल आणि अथांग अशी श्रद्धा ठेविली; त्या मानवतेला मनःपूर्वक आवाहन करण्याची तयारी ठेविली; आणि म्हणूनच महाराजांना या अलौकिक गोष्टी शक्य झाल्या.

सर्वसामान्य माणसांच्या माणुसकीविषयीं ज्या श्रद्धा श्री महाराजांनीं बाळगिल्या त्यांचें रूप काय होतें ! त्या श्रद्धांचें रूप असें असतें—

सर्वसामान्य माणसांच्या गुण-दोषांकडे पाहिलें असतां जरी असें दिसत असलें, कीं मोडतोड आणि नासधूस असल्या गोष्टी सर्वसामान्य माणसांच्या हातून सारख्या घडत असतात, तरी जोडणें, उभारणें आणि राखणें या गोष्टीं-कडेहि सर्वसामान्य माणसांचा ओढा असतो. चांगल्या गोष्टी सर्वसामान्य माणसाला समजतात आणि आवडतात. चांगल्या गोष्टींसाठीं कष्ट करायला आणि खस्ता खायला सर्वसामान्य मनुष्य तयार असतो.

श्री शिवाजीमहाराजांच्या चरित्रांत जागजागीं प्रत्यंतर मिळतें, कीं सर्वसामान्य माणसाच्या माणुसकीविषयीं ही श्रद्धा महाराजांच्या अंतःकरणांत निर्विकल्प होती—आणि खालील उताऱ्यांत वानगीदाखल प्रत्यंतर आहे, कीं सर्वसामान्य माणसांच्या माणुसकीविषयींची ही भक्ति आणि ही श्रद्धा महा-राजांचे निकटवर्ति, महाराजांचा मित्रपरिवार आणि महाराजांचे सेवक यांनीहि आत्मसात् केलेली होती.

" आरमारास तक्ते, सोट, डोलाच्या काठ्या आदिकरून थोर लांकडें असावीं लागतात. आपले राज्यांत अरण्यांत सागवानादि वृक्ष आहेत; त्यांचें जें अनुकूल पडेल तें लाकूड हुजूरचे परवानगीनें तोडून न्यावें. याविरहित जें लागेल तें परमुलुखीहून खरेदी करून आणवीत जावें. स्वराज्यांतील आंबे, फणस आदिकरून हीं लांकडेंहि आरमाराच्या प्रयोजनाचीं; परंतु त्यांस हात लावूं देऊं नये. काय म्हणोन, कीं झाडें वर्षा दोन वर्षांनीं होतात असें नाहीं. रयतांनीं हीं झाडें लावून, लेकरांसारखीं बहुत काळ जतन करून, वाढविलीं; तीं झाडें तोडल्यावर त्यांचे दुःखास पारावार काय ? एकास दुःख देऊन जें कार्य करीन म्हणेल तें कार्य करणारास हित स्वल्प काळचें; बुडोन नाहींसेंच होतें; किंबहुना धनियाचे पदरीं प्रजापीडनाचा दोष पडतो. या वृक्षांच्या

अभावें हानी होत्ये. याकरितां हे गोष्टी सर्वथैव होऊं न द्यावी. कदाचित् एखादें जें झाड बहुत जीर्ण होऊन गेलें असलें तरी त्याचे धन्यास राजी करून घेऊन, द्रव्य देऊन, त्याचे संतोषें तोडून न्यावें. बलात्कार सर्वथैव न करावा."

'झाडें वर्षा-दोन-वर्षांनीं होतात असें नाहीं' यास्तव कोणीं काय काळजी घ्यायची ! 'लोकांनीं वाढविलेलीं झाडें हीं लोकांना लेकरांसारखीं प्रिय असतात' हें ओळखून वागतील असे अधिकारी ज्यानें तयार केले त्या या मराठ्यांच्या राजाच्या असामान्य थोरवीला जगाच्या इतिहासांत कुठें जोड आहे काय ! प्रजेला जर खात्री पटली, कीं आपण जें जतन करून वाढवतों तें आपलें आहे आणि आपलें राहणार आहे; त्याचें अपहरण होईल ही भीति बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं; तर प्रजेच्या या स्वस्थपणामुळें आणि निर्भयपणामुळें कोणाकोणाचें काय काय कल्याण होण्यासारखें असतें ! 'हित कायमचें व्हावें; तें बुडोन नाहींसें होऊं नये' यासाठीं काय दक्षता राखली पाहिजे ! वृक्षांच्या अभावीं कोणकोणत्या प्रकारची हानि होते !

## ११. भीमाचें बळ आणि शरीर

महाराजांच्या अंतःकरणाला ओढा होता कीं लोक सुखी आणि तेजस्वी असावे; म्हणजेच लोकांनीं स्वहित ओळखावें आणि तें साधण्याच्या कामीं जागृत आणि उत्सुक असावें. महाराजांनीं मनांत नेहमीं सरळपणा वागविला, कीं 'लोकांचे मुद्दे मनास आणावे', आणि या सरळपणानेंच महाराज वागले. 'आदराचें आणि पराक्रमाचें' असेंच महाराज बोलले-आणि मराठी मनाला मंगलमय घडण महाराजांनीं दिली ती अशी, कीं 'बलात्कार सर्वथैव न करावा.'

प्रौढप्रतापी असा हा मराठ्यांचा राजा त्या काळच्या त्याच्या विरोधकांना कसा दिसत असे त्याचा थोडा मासला आपण पाहिला आहे. आणखी थोडा तोच प्रकार आज पाहूं :

वेंगुर्लें येथील डच व्यापारी पेढीच्या प्रमुखाला महाराज असे दिसले :

"आम्हीं मागलें पत्र रवाना केल्यानंतर, विजापूरकरांच्या सैन्यानें पाठलाग केल्यामुळें, शिवाजी ८ हजार शिपाई व ६० घोडेस्वार घेऊन,

पन्हाळ्याच्या बळकट किल्ल्यांत शिरला, आणि बाकीचें सैन्य त्यानें जिंकलेल्या ठाण्यांच्या बंदोबस्तासाठीं ठिकठिकाणीं रवाना केलें. पावसाळा जवळ आल्यामुळें शिद्दी जोहारला वेढा फार दिवस चालवितां येणार नाहीं असा शिवाजीचा अंदाज होता; पण हा त्याचा अंदाज चुकीचा ठरला; कारण शिद्दी जोहारनें बऱ्याच सैन्यानिशीं पावसाळ्यांत देखील वेढा चालू ठेवण्याचें ठरविलें व पावसाळी छपरेंहि बांधविलीं. किल्ल्यांत मीठ, तंबाखू वगैरे जिनसांचा तुटवडा असून, पुष्कळ पैसा भरून अलीअदिलशहाकडून माफी मिळविण्याची शिवाजी खटपट करीत आहे अशी लोकवार्ता आहे. तथापि अशी माफी देण्याचें नाकारण्यांत आलें. याकरितां थोड्या लोकांनिशीं किल्ल्यांतून निघून जावें असें शिवाजीनें योजलें; पण आंतल्या पठाणांनीं त्याला अडवून धरलें."

महाराजांच्याविषयीं कितीसा आदर या पत्रांत दिसतो? या पत्रावरून महाराजांच्या सैन्यबळाविषयीं काय कल्पना येते? ' साठमारीच्या ' खेळांत माजलेल्या हत्तीशीं झुंज घेणारा भालाइत जसा कांही क्षणांपुरता आडोसा घेतो तोच प्रकार शिद्दी जोहाराशीं झुंज देणाऱ्या महाराजांनीं पन्हाळा किल्ल्यावर केला होता असें म्हटलें तर? ढोबळ अशी एक चूक या पत्रांत आहे, ती कोणती? ही चूक होण्याचें कारण काय असेल?

इ. स. १६६४ सालीं महाराजांनीं सुरत शहर लुटलें. त्या वेळेचीं, ( इंग्लिश लोकांकडचीं ) दोन टिपणें अशीं आहेत :

स्वाली होल, ५ जाने–शिवाजी सुरतेपासून १०।१२ मलांवर आल्याची बातमी सायंकाळीं ३ वाजतां, प्रेसिडेंटनें कळवली. त्याचे मागणीप्रमाणें १० हत्यारबंद लोक कंपनीच्या मालाच्या रक्षणाकरितां सुरतेस पाठविले.

६ जानेवारी–दोन प्रहरीं अडीच वाजतां, ' सुरतेंतील माल व माणसें हीं धोक्यांत आहेत. तेथें फक्त १० माणसें ठेवून बाकीचे सर्व लोक पाठवा ' अशी प्रेसिडेंटची चिठ्ठी आली परंतु....फक्त ४२ शिपाई पाठविले. त्या रात्रीं शिवाजी शहरांत शिरला आणि जाळपोळ व लुटालुटीस सुरवात झाली. इंग्रजांच्या वखारींत १५० इंग्रज व ६० शिपाई रक्षणाच्या तयारीनें उभे राहिले. सुरतेचा मित्रा सुभेदार शहरांतील २० हजार माणसांना असहाय्य

स्थितींतच सोडून किल्ल्यांत पळून गेला! इंग्रजांप्रमाणें डचहि तयारीनें राहिले. इंग्रजांच्या वखारीजवळ ते लोक येतांच इंग्रजांनीं शिवाजीचे ३ शिपाई व एक घोडा ठार केला. या उदाहरणामुळें आर्मेनिअन्स् वगैरे परदेशी लोकहि ठासून उभे राहिले. परंतु मनुष्यबळ अपुरें पडल्यामुळें कोणालाच चालून जातां आलें नाहीं, व शिवाजीची लूट अप्रतिहत चालू राहिली. सोनें, रुपें, मोतीं, हिरे इत्यादि मूल्यवान् जिनसांशिवाय त्यानें इतर क्षुद्र वस्तूंकडे ढुंकूनहि पाहिलें नाहीं!

महाराजांकडे पाहण्याची कोणती दृष्टि या टिपणांत दिसते?

इंग्लिश, डच, आर्मीनिअन् इत्यादि लोकांना मराठ्यांनीं उपसर्ग दिला नाहीं याचीं काय काय कारणें असतील? मराठ्यांच्याविषयीं तिरस्कार या टिपणांत दिसत नाहीं तो कां?

सुरतेच्या लुटीबाबत (वर दिलेलीं) टिपणें लिहिलीं गेलीं त्यानंतर चारच महिन्यांनीं सुरतेच्या एका इंग्लिश व्यापाऱ्यानें कारवार येथील आपल्या मित्राला पुढीलप्रमाणें लिहिलें आहे :

" विलक्षण धाडसी असा दरवडेखोर म्हणून शिवाजीची इतकी ख्याति झाली आहे, कीं लोकांनीं, 'त्याचें शरीर हवामय असून त्याला पंखहि आहेत' असें उठविलें आहे! एऱ्हवीं तो एकाच वेळीं अनेक ठिकाणीं प्रकट होतो या बातम्या शक्य तरी कशा होतात? आज तो एका ठिकाणीं आहे असें खात्री-लायक समजावें, तर एक दोन दिवसांत तो दुसऱ्या ठिकाणीं आहे असें कळतें; तर लगेच दूर दूर असलेल्या पांच सहा ठिकाणीं, एकामागून एक अशा तऱ्हेनें, अप्रतिहतपणें लुटालूट व जाळपोळ करतांना तो आढळतो! यामुळें त्याचें नांव सर्वतोमुखी झालें असून त्याला भीमाचें (हर्क्युलिस) सामर्थ्य आहे असें लोक मानतात. सुमारें ६० एक गलबतें (नवीं बांधून व सज्ज करून) घेऊन तो या बंदरावर (सुरतेवर) अचानक हल्ला करून इराण व बसरा इकडून परत येणारीं गलबतें लुटणार आहे अशी हूल उठल्यामुळें आमचे तोंडचें पाणी पळालें आहे! कित्येक लोकांच्या मतें शिवाजी एवढी तयारी करून खंबायत नदींतून जाऊन सुरतेप्रमाणेंच अहमदाबादची जाळपोळ व

लूट करणार आहे ! तो गोव्याला वेढा देईल हें आम्हांला मुळींच संभवनीय वांटत नाहीं. एखादा सख्त वेढा चालवीत बसण्याचें त्याच्या मनांतहि नाहीं. कारण त्यांत त्याला कांहीं लाभ होणार नाहीं. विनतटबंदीचीं नगरें धावतां पळतांना जाळून लुटावीं असा अनायासें मिळणारा लाभ त्याला नेहमीं पाहिजे असतो. तुमच्या तेथपर्यंत तो येणार नाहीं; कारण पावसाळ्यांत घोडा किंवा मनुष्य यांना तिकडील प्रवास सुखाचा होणार नाहीं. आणि दुसरें असें, कीं विजापूरच्या शाहानें त्याच्यावर सैन्य पाठविलें तर त्याला रिकामा वेळ लाभणार नाहीं. तथापि आपण सुरक्षित आहों या विश्वासावर राहूं नका. शिवाजीच्या पाळतीवर असा; आणि वेळ येतांच सुरक्षित ठिकाणीं जातां येईल अशा तयारीनें रहा, हाच आमचा सल्ला आहे. हुबळी हें ठिकाण आम्हांला सुरक्षित वाटतें. तरी कंपनीची सर्व मालमत्ता तिकडे नेण्याची तजवीज करा."

हें पत्र लिहिलें गेलें त्या काळीं (जून १६६४) हे इंग्लिश लोक महाराजांना काय समजत असत ? 'लुटालूट आणि जाळपोळ' यांचा जो 'आरोप' या पत्रांत आहे तें खरोखर काय असे ? 'सर्वतोमुखीं' झालेलें महाराजांचें नांव आणि 'लोक जें मानतात तें' यांचा कितीसा अर्थ या पत्रलेखकानें ओळखलेला दिसतो ? 'महाराज सुरतेवर आरमारी हल्ला करणार आहेत', 'महाराज अहमदाबाद लुटणार आहेत', 'महाराज गोव्याला वेढा देतील हें संभवनीय नाहीं,' 'महाराज कारवारपर्यंत जाणार नाहींत' हे उद्गार काय काय दर्शवितात ? 'रिकामा वेळ' हे या पत्रांतले शब्द आपल्या अंतःकरणांत अशीच खळबळ उडवितात ना, कीं महाराजांच्या उभ्या आयुष्यांत 'रिकामा वेळ' हा त्यांना माहितसुद्धां नव्हता ? या विलायती व्यापाऱ्यांना (किंवा कोणाही व्यापाऱ्यांना) महाराजांपासून भय होतें काय ? मग या पत्रांत जी भीति व्यक्त आहे तिचें कारण काय ? महाराजांनीं जो **व्यापार** मांडला होता त्यांतून त्यांना कोणता **लाभ** मिळवायचा होता ? तो **लाभ** 'धांवतां-पळतां आणि अनायासें मिळणारा' आहे किंवा कसा आहे याचा काय विचार महाराजांनीं केलेला होता ? या पत्रलेखकाच्या मतें हुबळी हें कारवारापेक्षां अधिक सुरक्षित होतें. कारवारापेक्षां हुबळी अधिक सुरक्षित कसें या प्रश्नाला आपण काय उत्तर देणार ?

## १२. जें कोणाच्याच ऊर्जिताचें नव्हे !

इ. स. १६६५ सालीं, सप्टेंबर-ऑक्टोबरच्या दरम्यान, शिवाजी महाराज आणि औरंगजेब यांनीं **पुरंदरचा तह** केला हें आपल्याला माहित

आहे. त्या तहांतलीं कांहीं **कलमेंहि** आपल्याला आठवतात. पण आपण थोडें पुढें जाऊं, आणि त्या तहाबाबत खुद्द औरंगजेबानें महाराजांना लिहिलेलें पत्र (विचारपूर्वक) वाचूं, तर तें पत्र आणि त्याचें वाचन आपल्याला अधिक उद्‌बोधक आणि मनोरंजकहि होईल. औरंगजेबाचें तें पत्र असें आहे—

" शिवाजी राजे यांणीं बादशाही कृपेचे उमेदवार होऊन जाणावें, कीं सांप्रत तुमचें पत्र बहुत नरमाईचें राजे जैसिंग यांचे भेटीबद्दल कळलें. कृत्य माफ व्हावें म्हणून घेतलें याचें पाहून गोड ध्यानास आला. यापूर्वीं तुमचे मनांतील हाशील सरकार कामगारांनीं समजविलें होतें, कीं तुम्ही आपले कृत्यांचा पश्चात्ताप करून, या दौलतीचे आश्रयास येऊन, तीस किल्ले आपणांकडील इकडील कामगारांचे स्वाधीन करून, बारा किल्ले व त्यांजखालील मुलुख एक लक्ष होनांचा, त्याचप्रकारें निजामशाहीचे किल्ले व मुलुखापैकीं आणखी चार लक्ष होनांचा मुलुख तळकोंकणांतील विजापूरकरांचे इलाख्याचा जो हालीं तुमचेकडे चालू आहे व पांच लक्ष होनांचा मुलुख बालेघाटापैकीं विजापूरचे इलाख्यापैकीं, येणेंप्रमाणें एकंदराचा फर्मान बादशाही मागतां व चाळीस लक्ष होन, दरसाल तीन लक्षप्रमाणें, पेशकसीबद्दल देऊं म्हणतां. ऐशियास, तुमच्या गोष्टी ज्या तुम्हीं तूट अंदेशा न पाहातां केल्या त्या माफीजोग्या नाहींत. तथापि राजे जैसिंग यांणीं लिहिल्यावरून तें सर्व माफ करून तुमच्या मनोरथाप्रमाणें बारा किल्ले देतों. त्यांचा तपशील खालीं लिहिला आहे. व त्यांच्याखालचा मुलुख देऊन आणखीं हुकूम केला आहे, कीं जो मुलुख नऊ लक्ष होनांचा त्यापैकीं चार लक्ष होनांचा तळ कोंकणपैकीं विजापूरकरांचें इलाख्यापैकीं हाली तुम्हांकडे चालत आहे तो बंदोबस्ताकरितां इकडील सरकारांत आला. सबब बालेघाटी पांच लक्षांचा मुलुख, विजापूर आमचे हातीं येईल त्या आधीं तुम्हीं त्यांजकडून घेतल्यास, व चांगले फौजेसुद्धां राजे जैसिंग यांस मिळोन बादशाही कामांत त्यांचे मर्जीप्रमाणें कोशीस केल्यास, विजापूर फत्ते झाल्यानंतर तुम्हीं पेशकसीचे ऐवजाचा भरणा केल्यास, तुम्हांकडे बहाल ठेवूं. हालीं आमचे चिरंजीवास पांच हजारी मनसब व पांच हजार स्वार कीं एकेकांचीं दोन दोन तीन तीन घोडीं असावीं—याप्रमाणें देऊन, तुम्हांकरितां पोशाख पाठवून, हा फरमान आपले पंजाच्या चिन्हांसुद्धां

पाठविला आहे. तरी तुम्हीं इकडील लक्षांत वागोन, बादशाही काम लहान मोठेंसुद्धां करून, हें सर्व आपलें ऊर्जिताचीच गोष्ट समजावें. ”

या पत्राच्या आरंभीं औरंगजेब बादशहानें स्वतःकडे कोणता मोठेपणा घेतला आहे ? स्वतः औरंगजेब किती **साधा** राहात असे याविषयीं काय आख्यायिका आपण ऐकल्या आहेत ? मग या पत्रांत जी ‘ मोठेपणा ’ ची भाषा आहे तो मोठेपणा कसला आणि कोणाचा ? औरंगजेब महाराजांना म्हणतो, “ तुमच्या या नरमाईच्या बोलण्यावर मीं एकाएकीं विश्वास ठेवलेला नाहीं.—” असें म्हणून औरंगजेब काय सुचवीत असावा ? औरंगजेबाच्या मतें, ‘ महाराजांनीं तूट–अंदेशा पाहिला नाहीं. ’ तो तूट–अंदेशा कोणता ? औरंगजेबाच्या अंतःकरणांत अशी भीति असावी काय, कीं आपण विजापूर खालसा करूं त्यापूर्वीं विजापूरकरांचा बराचसा मुलुख महाराज जिंकून घेतील ? एकेका स्वारामागें दोन–दोन, तीन–तीन घोडीं ठेवणें कां आवश्यक असावें ? औरंगजेबाला हा **भ्रम** कां झाला असावा, कीं आपण सुचविलेल्या या गोष्टी महाराजांच्या **ऊर्जिताच्या** आहेत असें महाराज मानतील ?

## १३. कांहीहि करण्याला तयार असा बादशाही बंदा !

श्री शिवाजीमहाराजांच्या चरित्राचा अभ्यास आपण जों जों करूं, महाराजांचे विचार आणि त्यांचें वागणें हीं आपण जों जों पाहूं तों तों आपल्याला आढळून येईल, कीं जो खटाटोप महाराजांनीं केला तो सर्व खटाटोप अत्यंत थोर अशा एका विशाल आणि व्यापक ध्येयासाठीं केला.

महाराजांच्या अंतःकरणाला एकच ओढ होती, कीं मनुष्यमात्र सतेज आणि सुखी असावें; शांतता, समृद्धि आणि समाधान यांनीं सर्वसामान्य माणसाच्या जीवनाचें ‘ स्थिरचर व्यापून उरावें. ’

महाराजांना ‘ खुणा ’ पटलेल्या होत्या, कीं माणसें सुखी असायला हवीं असतील तर तीं निश्चयी, प्रयत्नशील आणि शीलसंपन्न असलीं पाहिजेत— माणसांमाणसांमध्यें जे व्यवहार व्हावयाचे त्या व्यवहारांत, माणसांमाणसांमध्यें परस्परांविषयीं आदर, आस्था, विश्वास, स्नेह, प्रशंसा आणि प्रोत्साहन यांचें अधिराज्य असलें पाहिजे.

सर्वांच्या सुखाला आणि सतेजपणाला वाहिलेले, आणि कल्याणाच्या

खुणा ओळखून त्यांमध्यें दंग राहिलेले अशा श्री शिवछत्रपतींशीं दावा धरून असलेल्या कांहीं माणसांनीं काढलेले दुष्ट उद्गार आपण वाचले आहेत. आतां हीं दोन पत्रें वाचूं या—कांहीं गोष्टी समजून घेऊं या; आणि जशी करायला पाहिजे तशी, त्या गोष्टींची संभावनाहि करूं या :

" विजापूर, गोवळकोंडा आणि शिवाजी या त्रयीच्या विरुद्ध माझें सर्व सामर्थ्य एकवटून मीं प्रयत्न केला आहे व करीतही राहीन. शिवाजीनें कसें तरी मला एकदां भेटावयास यावें अशा तजविजींत मी आहें. म्हणजे येतां-जातांना केव्हां तरी संधी साधून माझे हुशार लोक त्याचा नाश करतील ! हा बादशहाचा बंदा लोकांच्या निंदास्तुतीकडे न पाहतां बादशाही कार्य फत्ते करण्याकरितां कांहीहि करण्यास तयार आहे. बादशहांनीं संमति दिली तर त्याच्या कुळाशीं शरीरसंबंध जोडण्याचें म्हणजे माझ्या मुलाला त्याची मुलगी करण्याचें बोलणें लावण्यास मी तयार आहें. त्याचें घराणें आणि जातकुळी माझ्यापेक्षां इतकी हीन आहे, कीं आम्ही त्याचा स्पर्श झालेलें अन्नहि खाणार नाहीं, मग लग्नसंबंधाची गोष्ट कशाला ? त्याची मुलगी पकडून आणली गेली तरी मी तिला आपल्या जनानखान्यांतहि ठेवणार नाहीं ! पण तो हीन कुळांतला असल्यामुळें हें आमिष गिळून गळाला अडकेल ! हा बेत गुप्त राखला पाहिजे ! उत्तर त्वरित पाठवावें. "

" पूर्वीं शिवाजीला परत जाऊं द्यावें असें मीं विनविलें होतें तेव्हां दख्खनमधील परिस्थिति थोडी निराळी होती. आतां मोंगलांची परिस्थिति थोडी बिकट झाली असल्यामुळें, शिवाजीला इकडे सोडणें शहाणपणाचें होणार नाहीं. परंतु तेथें ठेवण्यांतहि सावधगिरी राखिली पाहिजे. नाहीं तर त्याचें जीवित व स्वातंत्र्य धोक्यांत आहे अशी कल्पना झाली म्हणजे त्याचे ( दक्षिणें-तील ) अमलदार निराशेनें आदिलशहाला मिळतील आणि मग सर्वत्र अंदाधुन्दी माजून बखेडा मात्र होईल.

शिवाजीवर मला खुद्द बादशहांनीं पाठविलें....अगदीं थोड्या वेळांत मला यश प्राप्त झालें आणि नंतर हजारों युक्त्या करून त्याला आणि त्याच्या मुलाला दोघांनाहि मीं बादशहांसमोर पाठवून दिलें. बादशहांना या गोष्टी माहीत आहेत. असें असून दरबारी लोक आतां म्हणतात, ' शिवाजी हा असा

होता, हें तुला माहीत असतांना त्याला कशाला दरबाराला पाठविलें ?'.... असें ऐकतों ! जेव्हां मीं त्याला पन्हाळ्यावर पाठविलें तेव्हांहि 'जयसिंगानें त्याला आपल्या काबूंतून पळून जाण्यास संधी दिली' अशीहि टीका लोकांनीं केली ! आणि आतां त्याला (ताब्यांत आणून देण्याकरितां) बादशाही मुलाखतीला पाठविले तरीहि, 'कशाला पाठविलें ?' म्हणणें आहेच !"

हीं दोन्ही पत्रें एकाच माणसानें—मिर्झा राजा जयसिंग यानें इ. स. १६६६ त लिहिलेलीं आहेत.

त्याच्या लोकांची **हुषारी** आणि त्यांनीं करावयाचे **पराक्रम** यांविषयीं या वयोवृद्ध आणि कर्तबगार रजपुताचे विचार काय आहेत ? निंद्य वर्तनाविषयीं तिरस्कार व्यक्त करण्याइतका **जिवंतपणा** त्या काळच्या लोकांत होता याची कोणती खूण या पत्रांत आहे ? "माझी आई या स्त्रीसारखी सुंदर असती तर—" या उद्‌गारामुळें जगाच्या पूजेला पात्र झालेले महाराज, आणि त्यांना ज्यांच्याशीं 'दोन हात' करावे लागले ते हे लोक, यांतलें **अंतर** किती असावें ? आणि तें कसें मोजायचें ? महाराज कोणाहि माणसाची **परीक्षा** करीत तेव्हां ते काय शोधीत असावें ? त्या माणसाची **जातकुळी** कीं अन्य कांही ? **अन्य कांही** असेल तर तें काय असेल ? महाराज आग्र्याला असतां औरंगजेबाकडून त्यांना अपाय झाला असता तर त्याचे परिणाम काय झाले असते असें जयसिंगाला वाटत होतें ? जयसिंगाच्या या अंदाजाबाबत तुम्ही काय म्हणाल ? 'दरबारी लोक काय म्हणतात ?' त्याविषयीं इतकी पर्वा जयसिंग कां करीत असावा ?

**राष्ट्राचा इतिहास पूर्ण करणें कर्तव्य हें आपुलें ।**
**ज्यांच्या निर्मल हृत्पटावर असें हें स्पष्ट रेखाटलें ॥**
**त्यांनीं रायगडीं प्रवास करुनी घालावयाला भर ।**
**त्यामध्यें निजबुद्धिला रमवुनी व्हावें सदा तत्पर ॥**
**'तेथें काय असे गडावर ?' असें आणा न चित्तीं कदां ।**
**'तेथें काय नसे ?' मनास आपुल्या ऐसें पुसावें सदा ॥**
**केलें राज्य शिवाजिनें बनवुनी जें वर्णनीय स्थल ।**
**तेथें काय कमी तयास पडतें सद्बुद्धिचें ज्या बल ॥**
**जिज्ञासावश जाल होउनि तरी ज्ञानार्थ जोडाल कीं ।**
**प्रेमानें जरि जाल तेथ भर ती घालाल मोठी सुखीं ॥**
**कर्तव्यास मनीं धराल तरि दे उत्साह तुम्हांप्रती ।**
**टाका आळस जा वरी बघुन घ्या नेत्रीं शिवाच्या कृती ॥**

**—मोरो गणेश लोंढे**

यापुढील कांहीं प्रकरणें वाचतांना शब्दार्थांच्या या टिपणाचा उपयोग होईल :—

मशरुल अनाम–लोकांत लौकिकवान्; जुम्लेदार–समाइकी जमिनीवरील अधिकारी; दिमत–संबंधीं, कडील; पायगो–पागा; विले-व्यवस्था, सोय, तजवीज; सुबेयांत-सुभ्यांत; सामा–सामान; वरकड–इतर जिनसा, विलात (विलायत)–प्रदेश; तसवीस–त्रास, उपसर्ग, उपद्रव; हाल–आतां; बैठी–मुक्काम; रातीब–ठराविक प्रमाण, रोजचें माप; धुंदी करून–वाटेल तसें, बिनहिशेबी; पावखलक–पायदळांतील सैनिक; यादी धरून–लक्षांत ठेवून, काळजीपूर्वक; अजार–त्रास; रास–घाऊक; ज्याजती–बळजबरी; खलक–लोक; खण धरून-झोंपड्यांतून; रंधनाला–स्वयंपाकाला; अविस्रा–एकाएकीं; लहळ्या-पेंड्या; निसूर–निष्काळजी; रोखा–कागद, हुंकूम; खलक–क्षुद्र, नीच; समजों–समजून; ज्यास्ती–कडक शिक्षा.

वरात–मागणी, गरज असल्याची सूचना; अजब–अपूर्व, आश्चर्यकारक; नादान–अर्धवट अकलेचा, दुष्ट; याला ऐवज–याच्या ऐवजीं; खजाना–द्रव्य; रसद–युद्धोपयोगी सामग्री आणि दाणागोटा; मजरा–वालते केलेलें; रिझणें–संतुष्ट राहाणें, समाधान पावणें; मुलाहिजा–पर्वा; बोभाट–तक्रार; गनीम–शत्रु; बरा–योग्य, भरपूर; नतीजा–बदला, शिक्षा.

कुली–सर्व; रुजुवात–स्नेहाचे संबंध, आदर, निष्ठा; दस्तखत–स्वतः लिहिलेलें पत्र; मुबारक–शुभ; दस्तपंजियानसी–हाताच्या तळव्याच्या ठसा उठविलेलें; आदब–दरबारी पद्धत; शिरभाई–मस्तक जमिनीपर्यंत लववून केलेलें अभिवादन; तसलीम–लवून केलेला सलाम; इज्जती होऊन–प्रतिष्ठा करून; घटी बरेपणा–दाट स्नेह; मदार–विश्वास, जबाबदारी, भार; मनसुबा हातास आला–श्रेयाचें साधन लाभलें; दराज करावी–वाढवावी; कौल–इमान, प्रमाण, वचन.

# १४. कलागती करावयाची गरज नाहीं !

सर्वसामान्य माणसाच्यो आयुष्यांतले कष्ट, आणि त्याला भोंवणाऱ्या कलागती, हीं जीवनांतून नाहींशीं व्हावीं यासाठीं महाराजांनीं जो अट्टाहास केला तो करतांना त्यांना किती गोष्टींचा विचार करावा लागला असेल ? त्यांचें थोर अंत:करण किती गोष्टींनीं व्यग्र राहिलें असेल ?

हें एक पत्र वाचूं या म्हणजे या प्रश्नाचें थोडेंतरी उत्तर आपल्याला मिळेल :

" मशरुल अनाम राजश्री जुमलेदारांनीं व हवालदारांनीं व कारकुनांनीं दिमत पायगो मुकाम मौजे हलवर्ण तर्फ चिपळून, मामले दाभोळ प्रति राजेश्री शिवाजी राजे. कसबें चिपळूणीं साहेबीं लष्कराची विले केली आणि या उपरी घाटावरी कटक जावें ऐसा मान नाहीं म्हणून एव्हां लावणीस रवाना केलें. ऐसीयास, चिपळूणीं कटकाचा मुकाम होता याकरितां दाभोळच्या सुबेयांत पावसाळ्याकारणें पागेस सामा व दाणा व वरकड केला होता. तो कित्येक खर्च होऊन गेला व चिपळूणाआसपास विलातींत लष्कराची तसवीस व गवताची व वरकड हरएक बाब लागली. त्याकरितां हाल कांहीं उरला नाहीं. ऐसें असतां वैशाखाचे दिवस, उन्हाळा, हेहि पागेस अधिक बैठी पडली. परंतु जरूर जालें. त्याकरितां कारकुनांकडून व गडोगडीं गल्ला असेल तो देऊनच जैसी तैसी पागेची बेगमी केली आहे. त्यास तुम्ही मनास माने ऐसा दाणा रातीब गवत मागाल; असेल तोंवर धुंदी करून चाराल; नाहींसें जालें म्हणजे मग कांहीं पडल्या पावसांत मिळणार नाहीं. उपास पडतील; घोडीं मरावयास लागतील म्हणजे घोडीं तुम्हींच मारिलीं ऐसें होईल. व विलातीस तसवीस देऊं लागाल. ऐशास, लोक जातील. कोण्ही कुणब्याचे येथील दाणे आणील, कोण्ही भाकर, कोण्ही गवत, कोण्ही फाटें, कोण्ही भाजी, कोण्ही पाले. ऐसे करूं लागलेत, म्हणजे जीं कुणबीं घर धरून जीवमात्र घेऊन राहिलीं आहेत तींहि जाऊं लागतील. कित्येक उपाशीं मरायला लागतील. म्हणजे त्यांना ऐसें होईल, कीं मोंगल मुलकांत आले त्याहूनहि अधिक तुम्ही ! ऐसा तळ-तळाट होईल ! तेव्हां रयतींची व घोड्यांची सारी बदनामी तुम्हांवरी येईल

हें तुम्हीं बरें जाणून, सिपाई हो अगर पावखलक हो, बहुत यादीं धरून वर्तणूक करणें. कोण्ही पागेस अगर मुलकांत गांवोगांव राहिले असाल त्यांणीं रयतेस काडीचा अजार द्यावयाची गरज नाहीं. आपल्या राहिल्या जागांतून बाहेर पाय घालाया गरज नाहीं. साहेबीं खजानांतून वाटणिया पदरीं घातलिया आहेती. ज्याला जें पाहिजे, दाणा हो अगर गुरेंढोरें वागवीत असाल तर त्यांस गवत हो, अगर फांटें, भाजीपाले व वरकड विकावया येईल तें रास घ्यावें; बाजारास जावें, रास विकत आणावें. कोण्हावरी जुलूम, अगर ज्याजती, अगर कोण्हासी कलागती करावयाची गरज नाहीं. व पागेस सामा केला आहे तो पावसाळा पुरला पाहिजे. ऐसे तजविजीनें दाणा रातीब कारकून देत जातील तेणेंप्रमाणेंच घेत जाणें; कीं उपास न पडतां रोजबरेजा खायला सांपडे, आणि होत होत घोडीं तवाना होत, ऐसें करणें. नसतेंच कारकुनांसी धसपस कराया, अगर ' अमकेंच द्या, तमकेंच द्या ' ऐसें म्हणाया; धुंदी करून खासदार कोठींत, कोठारांत, शिरून लुटाया गरज नाहीं. व हल्लीं उन्हाळ्याला आहे तइसे खलक पागेचे आहेत; खण धरून राहिले असतील व राहतील; कोण्ही आगट्या करतील; कोण्ही भलतेच जागां चुली रंधनाला करतील; कोण्ही तंबाकूला आगी घेतील; गवत पडिलें आहे ऐसें, अगर वारें लागलें आहे ऐसें मनांत न आणितां घेतील. म्हणजे अविस्राच एखादा दगा होईल. एका एका खणास आगी लागली म्हणजे सारे खण जळोन जातील. गवताच्या लहळ्यांस कोणीकडून तरी विस्तो जाऊन पडला म्हणजे सारें गवत व लहळ्या, आहेत तितक्या, एक एक जळों जातील. तेव्हां मग कांहीं कुणबियांच्या गर्दना मारल्या अगर कारकुनांस ताकीद करावी तैसी केली, तऱ्ही कांहीं खण कराया एक लाकूड मिळणार नाहीं; एक खण होणार नाहीं, हें तों अवघियांला कळतें. याकारणें बरी ताकीद करून, खासे खासे असाल ते हमेशा फिरत जाऊन, रंधनेकरितां, आगट्या जाळितां, रात्रीस दिवा घरांत असेल, अविस्रास उंदीर वात नेईल, ते गोष्टी न हो; खण, गवत वांचेल तें करणें. म्हणजे पावसाला घोडीं वांचलीं. नाहीं तर मग घोडीं बांधावीं नलगेत; खायास घालावें नलगे. पागाच बुडाली. तुम्ही निसूर जालेत ऐसें होईल. याकारणें तपशिलें तुम्हांस लिहिलें असे. जितके खासे खासे जुमलेदार, कारकून आहां तितके हा रोखा तपशिलें ऐकणें आणि हुषार राहणें. वरचेवरी,

रोजचा रोज, खबर घेऊन, ताकीद करून येणें. येणेंप्रमाणें वर्तणूक करितां ज्यापासून अंतर पडेल, ज्याचा गुन्हा होईल, बदनामी ज्यावर येईल त्यास— मराठियांची तों इज्जत वाचणार नाहीं, मग रोजगार कैसा ? खळक समजों ज्याजती केल्यावेगळ सोडणार नाहीं हें बरें जाणून वर्तणूक करणें. ”

पत्राच्या आरंभीं ‘ राजमान्य राजश्री ’ असें संबोधण्याची वहिवाट आहे. पूर्वीच्या काळीं, हाच आशय व्यक्त करण्यासाठीं, ‘ मशरुल अनाम ’ म्हणत असत असें दिसतें. या ‘ मायन्यां ’ च्या अर्थांत काय अंतर आहे ? तुमच्यासाठीं यांतला कोणता मायना तुम्हांला आवडतो ?

सैन्यांतील लोकांकडून होण्यासारखे गाफीलपणाचे, बेदरकारपणाचे कोणकोणते प्रकार या आज्ञापत्रांत उल्लेखिले आहेत ? सैन्यांतील अधिकारी, त्याचप्रमाणें इतर सरकारी अधिकारी यांच्याकडून रयतेला किती प्रकारांनीं त्रास होण्याचा संभव असतो ? त्यांतल्या कोणत्या प्रकारांचा उल्लेख महाराजांनीं केला आहे ? गाफीलपणाचे, बेदरकार-पणाचे, प्रजेला उपद्रव करण्याचे हे प्रकार तर हीनपणाचे आहेत—आणि महाराजांना ते माहित आहेत ! महाराजांसारख्या श्रेष्ठाला हे दुष्टपणाचे प्रकार माहित आहेत याचा काय अर्थ आपण करायचा ? या आज्ञापत्रांत ‘ जरब ’ किती आहे ? ‘ सौजन्याला आवाहन ’ कुठें कुठें आहे ? ‘ खासे ’ जे आहेत त्यांना काय सूचना आहेत ? या ‘ खाशां ’ कडून महाराजांच्या अपेक्षा काय आहेत ? त्या काळांत कुणब्यांची स्थिति कशी असावी ? त्याच्या कोणत्या खुणा या आज्ञापत्रांत आहेत ? हा ‘ रोखा ’ ता. १९ मे १६७३ रोजीं लिहिलेला आहे. महाराजांना राज्याभिषेक झाला त्यापूर्वीं किती दिवसांचा हा रोखा आहे ? मशरुल अनाम जुमलेदार, हवालदार व कारकून यांनीं ज्या ‘ इज्जती ’ ची चाड ठेवावी ती इज्जत कोणाची—कोणा व्यक्तीची वा एखाद्या विशिष्ट जाती-जमातीची—आहे ? देशांतल्या तमाम जनतेला ‘ इज्जत ’ आहे अशी श्रद्धा बाळगणारा हा राजा लोकोत्तर चरित्राचा नव्हे काय ?

## १५. गनीम जालेस बरा नतीजा पावाल !

प्रौढप्रताप श्रीशिवाजीमहाराजांच्या लोकोत्तरपणाचीं जीं अनेक प्रत्यंतरें मिळण्यासारखीं आहेत त्यांतलें एक आपण नुकतेंच पाहिलें तें असें, कीं महाराजांना ‘ इज्जतीची चाड ’ होती–आणि ती चाडसुद्धां कोणा एकदोघांच्या किंवा चारचौघांच्या इज्जतीची नव्हे, तर सर्व समाजाच्या इज्जतीची चाड होती. सर्वसामान्य माणसांना या इज्जतीची ‘ आण ’ घालावी आणि

त्यांची माणुसकी जागी करावी यासाठीं महाराज कसें झटत असत तें आपण पाहिलें आहे.

परंतु, जसे घरांतील वडिलधाऱ्या माणसांवर तसेच राज्यकर्त्यांवरहि असे प्रसंग येत राहातात, कीं जेव्हां त्यांना न्यायनिष्ठुर व्हावें लागतें, आणि 'गनीम' होणारांना—म्हणजे कर्तव्यच्युत, किंवा उघडउघड द्रोही अशांना— 'बरा नतीजा' पोंचता करावा लागतो! शिवाजीमहाराजांवर जेव्हां असले अप्रिय प्रसंग येत तेव्हां ते काय करीत तें आपण आतां पाहूं :

" राजश्री शिवाजी विनायक सुभेदार व कारकून सुभे मामले प्रभावळी, प्रती राजश्री शिवाजी राजे दंडवत. दौलतखान व दरियासारंग यांसी ऐवज व गल्ला राजश्री मोरोपंत पेशवे यांणीं वराता सुभे मजकुरांवरी दिधल्या. त्यास तुम्हीं कांही पाठविलें नाहीं म्हणोन कळोन आलें. त्यावरून अजब वाटलें, कीं ऐसे नादान थोडे असतील! तुम्हांस समजलें, कीं याला ऐवज खजाना रसद पाठविलिया मजरा होईल असें म्हणत असाल. तरी पद्मदुर्ग वसवून राजपुरीच्या (जंजिरा) उरावरी दुसरी राजपुरी केली आहे. त्याची मदत व्हावी; पाणी, फाटीं आदि करून सामान पावावें; या कामास आरमार बेगीनें पावावें; तें नाहीं.

पद्मदुर्ग हबशी फौजा चौफेर जेर करीत असतील; आणि तुम्ही ऐवज न पाववून, आरमार खोळंबून पाडाल! एवढी हरामखोरी तुम्ही कराल; आणि रसद पाठवून मजरा करूं म्हणाल त्यावरी साहेब रिझतील कीं काय? हे गोष्ट घडावयाची तऱ्ही होय न कळे, कीं हबशियांनीं कांही देऊन आपले चाकर तुम्हांला केले असतील! त्याकरितां ऐसी बुद्धि केली असेल! तरी असल्या चाकरास ठीक ठीक केले पाहिजेत! ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करूं पाहतो? याउपरी तऱ्ही त्याला ऐवज व गल्ला राजश्री मोरोपंतांनी देविला असेल व देवितील तो खजाना रसद पाविलियाहून अधिक जाणून तेणेंप्रमाणें आदा करणें, कीं ते तुमची फिर्याद न करीत; व त्यांचे पोटास पावोन, आरमार घेऊन, पद्मदुर्गाचे मदतीस रहात तें करणें. याउपरी बोभाट आलियाउपरी तुमचा मुलाहिजा करणार नाहीं. गनिमाचे चाकर, गनीम जालेस, ऐसें जाणून बरा नतीजा तुम्हांस पावेल. ताकीद असे."

आरमार समुद्रावर कामगिरीवर असतां किनाऱ्यावरील मुलकी अधिकाऱ्यांनीं आरमाराला कसें सहाय्य करावें अशी महाराजांची शिस्त असे ? महाराजांनीं नेमलेले अधिकारी 'नादान' असण्याऐवजीं कसे असतील ? महाराजांनीं पद्मदुर्गाखालीं जें आरमार ठेविलें होतें त्याच्या बाबतींत अधिकाऱ्यांनीं—सुभेदार व कारकून मजकूर यांनीं—कोणत्या गोष्टी चित्तांत वागवाव्या अशी महाराजांची अपेक्षा या पत्रांत दिसते ? या सुभेदाराला महाराजांनीं म्हटलें आहे, "एवढी हरामखोरी कराल आणि रसद पाठवून मजरा करूं म्हणाल"—अधिकारी असें करतात असा कटु अनुभव महाराजांना आलेला असेल काय ? या सुभेदाराबाबत महाराज कोणता संशय व्यक्त करतात ? तो संशय व्यक्त करायला महाराज नाखुष होते असें दिसतें. महाराज असे नाखुष कां असावे ? या सुभेदारालाः महाराजांनीं नुसती ताकीद दिली आहे. यावरून, विधायक अशीं, कोणकोणतीं अनुमानें काढतां येतील ?

# १६. मराठिया लोकांचें बरें करावें

महाराजांनीं आपल्या अवतारकार्याला आरंभ केला तेव्हां लोकांचीं मनें वळविण्यावर महाराजांचा मोठाच भर होता हें आपण समजून घेतलें आहे. महाराज आणि त्यांचे सवंगडी सुराज्यस्थापनेच्या प्रयत्नांच्या प्राणप्रतिष्ठेला बसले तेव्हां त्या 'साहसा' कडे 'संशयी' दृष्टीनें पाहणारे लोक आणि महाराजांना 'अप्रबुद्ध' असें म्हणणारे 'व्यवहारी मोरावळे' असंख्य होते.

इ. स. १६४६ ते १६७६ या काळांत महाराज आणि त्यांचा 'साहसी' मेळावा यांनीं अक्षरशः अविश्रांत श्रम केले आणि शेवटीं महाराजांच्या मनांत असलेलें 'मऱ्हाष्ट्रराज्य' सुप्रतिष्ठित झालें. सुराज्य स्थापनेच्या या प्रयत्नांत महाराजांना जसजसें यश येत गेलें तसतसे, 'संशयी' व 'मोरावळे' जे असंख्य होते ते 'संख्य' होत आले. पण ते 'असंख्य' असलेले जरी 'संख्य' झाले तरी 'संख्य' असे जे संशयी होते त्यांची मनधरणी करण्याचे महाराजांचे प्रयत्न अविरत चाललेले होते. हीं आर्जवें महाराज कशीं परोपरीचीं करीत तें आपण आतां या पत्रांत पाहूं या :

"ऐशियास दक्षणचे पादशाहीस पठाण जाला, हे गोष्टी बरी नव्हे ! पठाण बळावला म्हणजे एका उपरी एक कुली दक्षिणियांचीं घरें बुडवील,

कोणास तगों देणार नाहीं, असें आम्हीं समजोन हजरत कुतुबशाहा पादशहा यांसीं पहिलेपासून रुजुवात राखिली होती. त्यावरून सांप्रत हजरत कुतुबशाहांनीं मेहरबानी करून 'हुजूर भेटीस' येणें म्हणून दस्तखत मुबारक व दस्त-पंजियानिसी फर्मान सादर केला. त्यावरून आम्ही येऊन कुतुबशाहाची भेटी घेतली. भेटीचे समई पादशाही आदब आहे, का शिरभोई धरावी, तसलीम करावी. परंतु आम्ही आपणांवरी छत्र धरिलें असे ही गोष्ट कुतुबशाहास मान्य होऊन शिरभोई धरणें व तसलीम करणें हें माफ केलें. पादशाहा तिकडून आले; आम्ही इकडून गेलों; पादशाहांनीं बहुतच इज्जती होऊन गळ्यास गळा लाऊन भेटले. आम्हांस हातीं धरून नेऊन जवळी बैसविलें. कितीएक मेहेरबानी जाहीर केली आणि कुतुबशाहाचा व आपला घटी बरेपणा करून घेतला. याउपरी राजकारण-विषयीं हजरत कुतुबशाहांनीं महादण्णापंतांस व आम्हांस एकचित करून ऐसा तह केला, कीं जो काय उभयवर्गीं तह व्हावा तो आपण कबूल करावाच. एसा कुल मनसुबा व मदार आम्हांवरी टाकिला आहे, कीं 'आपली पादशाही जितकी वाढवूं ये तितकी वाढवणें; पठाणाची नस्तनाबूत करणें. दक्षणची पादशाही आम्हां दक्षिणियांच्या हातीं राहे तें करावें' म्हणून. त्यास हा मनसुबा ये प्रसंगीं आमचे हातास आलियाउपरी आम्हीं हाच विचार केला, कीं जे कांहीं आपले जातीचे मराठे लोक आहेती ते आपल्या कटांत घेऊन, कुतुबशाहासी त्यांची रुजुवात करावी. दौलत देवावी. त्यांचे हातें पादशाही काम घेऊन पादशाहाची पादशाही दराज करावी. आणि लोकांच्या दौलताहि चालेत, घरें राहेत, तें करावें. आपल्या जातीच्या मराठिया लोकांचें बरें करावें हें आपणांस उचित आहे ऐसें मनावरी आणून तुमचा आमचा वडिलांपासून दावा वाढत आला तो आम्हीं मनांतून टाकून, निष्कपट होऊन, तुम्ही मराठे लोक, कामाचे; तुमचें बरें करावें ऐसें मनीं धरून, हजरत कुतुबशाहासीं बहुत रीतीं बोलोन, तुम्हांस हजरत कुतुबशाहाचा कौलाचा फर्मान घेऊन पाठविला आहे."

महाराज म्हणतात, "हे गोष्टी बरी नव्हे" यांतील, 'हे गोष्टी' ती कोणती ? कोणती 'बरीगोष्टी' महाराजांच्या मनांत होती ? महाराजांनीं या पत्रांत ठिकठिकाणीं कुतुबशाहाविषयीं जो आदर दाखविला आहे तो कशासाठीं ?

'शिरभोई' व 'तसलीम' या गोष्टी एका मराठ्याला 'माफ' झाल्या या गोष्टीवरून इतरांना काय प्रेरणा मिळावी? एकाला मिळालेल्या या मोठेपणाचा 'विस्तार' कसा व्हावा? महाराजांच्या या पत्रांत अशी भावना दिसते काय, कीं "बादशहानें माझ्या राजेपणाला जी मान्यता दिली, आणि माझ्याविषयीं जो आदर दाखविला त्या गोष्टी म्हणजे आपणां 'दक्षणियां'चा गुणाढ्यपणा आणि आमचें सामर्थ्य हीं बादशाहाला पटलीं आहेत याच्या खुणा आहेत"? हें पत्र महाराजांनीं मालोजी घोरपडे या आदिलशाही सरदाराला लिहिलेलें आहे. महाराजांना राज्याभिषेक झाला तरीहि हे मालोजी घोरपडे 'संशयीं'च राहिले होते–'स्वत्वा'ची जाणीव त्यांना अजूनहि आली नव्हती. ते बलवान् होते पण त्यांचें बळ त्यांनीं स्वतः ओळखलें नव्हतें. अशा 'अर्धवट' माणसांना 'अर्थपूर्ण' वाटणाऱ्या कांहीं गोष्टी असतात. या गोष्टी गौण असतात. परंतु या गोष्टींना 'खरी किंमत' जरी बेताची असली तरी, कांहीं 'अर्धवटां'ना कार्यप्रवृत्त करण्याच्या कामीं त्या गोष्टींचा उपयोग होत असतो. प्रस्तुत पत्रांत महाराजांनीं असल्या 'गौण गोष्टीं'चा कांहीं उपयोग केला आहे. त्या 'गोष्टी' कोणत्या? त्यांचा 'उपयोग' करून घेण्याचा काय प्रयत्न महाराजांनीं केला आहे! "माझ्या मनांतलें तुमच्याविषयींचें वैर मीं काढून टाकलें आहें; मी निष्कपट झालों आहें–" असें आपण होऊन म्हणणाऱ्या माणसाची माणुसकी किती श्रेष्ठ दर्जाची असेल! प्रतिस्पर्ध्याच्याहि माणुसकीवरची त्याची श्रद्धा—सर्वच माणसांच्या सहृदयपणाविषयींचा त्याचा विश्वास–किती बळकट असेल!

## १७. उपेक्षेच्या जागीं आदर—

इ. स. १६६० ते १६६४ या काळांत डच व इंग्लिश व्यापारी महाराजांकडे किती उपेक्षेनें आणि बेमुर्वतपण पाहात असत त्याची दखल आपण घेतली आहे. पुढील आठदहा वर्षांत अशा कांही गोष्टी घडून आल्या कीं हेच विलायती लोक महाराजांविषयी (पुढीलप्रमाणें) आदरानें बोलूं लागले :

"सुरतेहून भीतीची बातमी आल्यामुळें प्रेसिडेंट सुरतेला गेला. स्वराज्यांतच शिवाजीला भरपूर व्यवधानें आहेत, असें जरी तुमच्या ९ तारखेच्या पत्रांत लिहिलें आहे, तथापि तो आपले हात दूरवर पसरतांना दिसतो. त्याच्याबरोबर एक आणि शिवाय बादशाही मुलुखांत एक अशीं त्याचीं दोन मोठीं सैन्यें संचार करीत आहेत. साल्हेरीला वेढा घालणाऱ्या दिलीरखानाच्या

सैन्याचा मोड करून त्या किल्ल्याचा त्यानें चांगला बंदोबस्त केला. दुसऱ्या एका लढाईंत त्यानें बहलोलखानाला ठार मारून साल्हेरींत सुमारें ३० मोठे अंमलदार कैदेंत ठेविले आहेत. आतां त्यानें मुल्हेर घेतलें हें निश्चित असून सुरतेचा मार्ग त्याच्या ताब्यांत असल्यामुळें तो केव्हांहि सुरतेला येऊं शकेल. मध्यरात्रींच तो सुरतेपासून २५ मैलांवर आल्याची बातमी आली. ती खरी असल्याचें दिसतें, कारण पूर्वी व्यापाऱ्यांना दरवाजांत[illegible] बाहेर न सोडणारा सुभेदार आतां बायकामुलें व संपत्ति सुरक्षित ठिकाणीं [illegible]स परवानगी देत आहे. ”

हे [illegible] इ. स. १६७२ च्या फेब्रुवारी महिन्यांत—मुंबईहून—लिहिलेलें [illegible] हे.

म[illegible] [illegible]ा स्वराज्यांत कोणतीं व्यवधानें होतीं ? या पत्रावरून महाराजांच्या सैन्यबळा[illegible] [illegible]ापण काय कल्पना करायची ? या काळांत महाराजांचा दरारा कसा होता या[illegible] [illegible]ी खूण या पत्रांत आहे !

[illegible] हें आणखी एक पत्र : ( महाराजांच्या राज्याभिषेकाला हजर असलेल[illegible] [illegible]श प्रतिनिधि ऑक्सिन्डेन यानें हें पत्र इ. स. १६७४ च्या मे किंवा जू[illegible] [illegible]न्यांत लिहिलें आहे. )

जू[illegible] ५ रोजीं, ‘ दुसऱ्या दिवशीं ७।८ वाजतां, सिंहासनारूढ राजाला मुजरा न[illegible] [illegible]रण्यासाठीं यावें ’ म्हणून निराजी पंडिताचा निरोप आला.

त[illegible] जून रोजीं : त्यावेळीं राजा भव्य सिंहासनावर आरूढ झालेला व मूल्यवा[illegible] [illegible]शाख केलेल्या प्रधानांनीं वेष्टिलेला दिसला. संभाजी राजे आणि पेशवा मो[illegible] [illegible] सिंहासनाखालीं लगत उंचवट्यावर बसले होते. सेनाध्यक्ष व राहिलेल[illegible] [illegible] अंमलदार बाजूला आदरानें उभे होते. मीं मुजरा केला व नारायण [illegible] [illegible]ानें नजरेची आंगठी वर धरली. शिवाजीचें लक्ष आमच्याकडे जातांच [illegible] अगदीं सिंहासनाच्या पायरीजवळ येण्याचा आम्हांला हुकूम केला व [illegible] [illegible]ऊन आम्हांला तात्काल रजा दिली. थोडाच वेळ आम्ही सिंहासन[illegible] [illegible]तों. तेवढ्या वेळांत, सिंहासनाच्या दोन्ही बाजूंला, सुवर्णांकित भाल्याच्य[illegible] [illegible]ावर ( मुसलमानी पद्धतीचीं ) अनेक अधिकारदर्शक व राजसत्तेचीं [illegible]न्हें असल्याचें आम्हीं पाहिलें. उजव्या हाताला मोठ्या दातांच्या

मत्स्यांची सुवर्णाचीं दोन मोठीं शिरें होतीं. डाव्या हाताला अनेक अश्वपुच्छें व एक मूल्यवान् भाल्याच्या टोंकावर समपातळींत लोंबणारीं सोन्याच्या तराजूचीं पारडीं, न्यायचिन्ह म्हणून, तळपळत होतीं. राजवाड्याच्या दाराशीं आम्ही परत आलों तों दोन सुन्दर पांढरे घोडे शृंगारून आणिलेले दिसले. गडाचा मार्ग इतका बिकट होता हें लक्षांत घेतां हे पशु कोठून वर आले असावे याचा आम्हांला तर्कच करवेना.

या उताऱ्याची भाषा जी संथ आणि प्रशांत अशी वठली आहे त्याचीं कारणें काय काय असतील ? या उताऱ्यांतील दृश्याचें चित्र काढायला बसलेल्या चिताऱ्याला तपशिलाबाबत कांही विचार करावा लागेल काय ? या देखाव्यांत जीं वेगवेगळीं माणसें आहेत त्यांच्या मुद्रांवर कोणकोणते भाव व्यक्त झालेले असतील ? गोंगाट, गोंधळ यांचा मागमूस तरी या वर्णनांत ऐकूं येतो काय ? या विलायती पाहुण्यांविषयीं अगत्य आणि आदर महाराजांनीं कशीं दाखविलीं ? न्यायाचें चिह्न असलेलीं तराजूचीं पारडीं भाल्याच्या टोंकावरून लोंबविण्यांत काय विशेष साधलें होतें ? ‘ गडावर घोडे कसे आणले असतील याचा तर्कच करवेना ’ असें हा चतुर इंग्रज म्हणतो. इतरहि कांही गोष्टी त्यानें पाहिल्या असतील काय कीं ज्यांविषयींहि त्याला कौतुक आणि आदरमिश्रित आश्चर्य वाटलें असेल ?

## १८. यैसा विचार करावा होता—

महाराजांच्या आयुष्यांत महाराज अनेकांना, अनेक परींनीं, सांगत आणि शिकवीत राहिले, कीं त्या अनेकांनीं ‘ कसा विचार करावा ’ आणि ‘ कसें वागावें. ’ महाराजांचा भाऊ व्यंकोजी यालाहि हा उपदेश करणें महाराजांना भाग झालें होतें. उदार, क्षमाशील अंतःकरण; करडी न्यायप्रीति; आणि राजकारणासाठीं—सर्वसामान्य माणसांच्या हितासाठीं—कठोर होण्याची तयारी यांचें उत्कृष्ट मिश्रण ज्यांत आहे असें हें आणखी एक पत्र आपण आज वाचूं या :

“ आशीर्वाद उपरि—कलासवासी साहेबीं कैलासवास केला त्यास आजी तेरा वर्षें जालीं. महाराजांचे पैके व जडाव व हाती व घोडे व मुलुख अवघेहि रा. रघुनाथपंतीं तुम्हांला राज्यावरी बैसवून संपूर्ण राज्य तुमचे हातीं दिल्हें. यैसियास आमचा आर्धा वांटा तेरा वर्षे तुम्हींच खादला. आम्हीं जरी तुम्हां-

जवळीं मागावें तरी बहुत दूर होतों. बऱ्या बोलें तुम्हीं देणार नव्हां. म्हणून तेरा वर्षे सबूरी केली. मनामध्यें यैसा विचार केला, कीं बरें, महाराजांचे पुत्र तेहि आहेत. खाती तोंवरी खात. मालाचे धनीच आहेत. जे समयीं आम्हांला फावेल ते समयीं आम्ही वेव्हार सांगोन घेऊं. यैसे मनीं धरून होतों. यैसीयास राजकारणप्रसंगें आम्ही कुतुबशहाचे भेटीस भागानगरास गेलों. तेथून कर्नाटकांत गेलों. चंजी घेतली व येलूरतफचा मुलुख घेतला. व सेरखानास झगडियांत मोडून गर्देस मेलविलें. सेरखानाचे हातीं मुलुख होता तेवढाहि घेतला. त्यावरी मजल–दरमजल कावेरीतीरास गेलों. तेथून तुम्हांला पत्रें लिहिलीं, कीं राजेश्री गोविंदभट व राजेश्री काकाजीपंत व राजेश्री निलोबा नाईक व रंगोबा नाईक व तिमाजी यक्षयार राऊ यैसे भले लोक आम्हांपासीं पाठवणें म्हणून तुम्हांला बहुतां रीतीं लिहून पाठविलें. त्यावरून तुम्हीं सदरहू भले लोक आम्हांपासीं पाठवून दिल्हे. त्या भले लोकांसीं बहुतां रीतीं घरोबियाचा वेव्हार सांगोन आमचा आर्धा वांटा आम्हांला बऱ्या बोलें द्या म्हणोन सांगोन पाठविलें. त्याबराबरी राजेश्री बालंभट व राजेश्री कृष्ण ज्योतिषी व कृष्णाजी सेखजी यैसे आपले तर्फेनें भले लोक दिल्हे. हे भले लोक तुम्हांजवळीं जाऊन बहुतां रीतीं बोलिले, कीं गृहकलह करूं नये; आपला अर्धा वांटा मागतात तो द्यावा, यैसे बोलिले. परंतु कपटबुद्धी तुम्हीं मनीं धरिलीं, कीं या समयांत आम्ही बहुत थोर राजे जालों आहों. आम्हांसी आपण खासा भेटीस येऊन हलभल नरमी बहुत दाखवावी, आणि आमचा वांटा बुडवावा. तेरा वर्षे सारें राज्य आपणच खादलें; पुढेंहि सारें राज्य आपणच खावें; यसी बुद्धी मनीं धरून, वाटियाच्या निवाडियाची तह न करतां, आपण खासाच आमचे भेटीस आलेस आमची व तुमची भेट जाली. त्या उपरी आम्ही बहुतां रीतीं तुम्हांसी बोलिलों, कीं आमचा वांटा अर्धा द्या. परंतु, तुम्ही वांटा द्यावा हा विचार मनीं धराचना. मग जरूर जालें, कीं तुम्ही धाकटे भाऊ आपण होऊन आमचे भेटीस आलेस तुम्हांला धरावें आणि वांटा मागावा हे गोष्टी थोरपणाचे इज्जतीमध्यें ल्याख नव्हे. या निमित्य तुम्हांला चंजाउरास जावयाचा निरोप दिधला....

आम्ही स्वार होऊन तोरगल प्रान्तास आलों. तेथें यैसी खबर आइकिली, कीं तुम्ही तुरुक लोकांच्या बुधीस लागोन, आमच्या लोकांसी झगडा

करावा यैसें मनीं धरून, आपली सारी जमेत येकवट करून, आमच्या लोकांवरी पाठवून दिलेत. ते बालगोडपुरास आले. तुमचे लोक चालोन आल्यावरी तुमच्या आमच्या लोकांत थोर झगडा झाला. तुमचे लोक पराजय पावले. प्रतापजी राजे व भिवजी राजे व शिवाजी दबीर यैसे तिघे धरिले व कितीयेक लोक मारिले कितीयेक पलोन दाणा दाण होऊन गेले. ऐसा समाचार आइकिला. हें एकोन बहुत नवल यैसें वाटलें, कीं कै. महाराज त्यांचे तुम्ही पुत्र, बहुत थोर लोक. यैसें असोन कांहीं विचार करीत नाहीं व धर्माधर्म विचारीत नाहीं ! यैसे असतां कस्टी व्हाल याचें नवल काय ? तुम्ही म्हणाल कीं काये विचार करावा ? तरी यैसा विचार करावा होता, कीं श्रीदेवाची व श्रीची कृपा त्यावरी पूर्ण जाली आहे. दुस्ट तुर्काला ते मारतात. आपल्या सन्यांतहि तुरुक लोकच असतां जये कसा होतो ? आणि तुरुक लोक कैसे वांचों पाहातात ? हा विचार करावा होता आणि युद्धाचा प्रसंग पाडावा नव्हता. परंतु दुर्योधनासारखी बुधी धरून युद्ध केलें आणि लोक मारविले. जें जालें तें जालें. पुढें तरी हट न करणें. तेरा वर्षें तुम्हीं सारें राज्य खादलें तें खादलें. याउपरी कितेक आमचें आम्हीं घेतलें असे. अरणी, बेंगळूर, कोल्हार, होसकोट, सिरलकटे व किरकोल जागे व चंजाऊर यैसे जे जागे तुमचे हातीं उरले आहेत ते आमचे लोकांचे हातीं देणें. आणि नकद पैके, व जडाव, व हाती व घोडे यांचा अरधा वांटा देणें. यैसा विचार करून आम्हांसी संधी करणें. तुम्हीं यैसा संधी निर्मलपणें केलिया आम्ही आपणां-पासोन तुम्हांला तुंगभद्रेआलाड, पनाले प्रान्ते, तिन्ही लक्ष होनांची दौलत देऊन, अथवा आम्हांजवळील दौलत तुम्हांला मानेना तरी कुतुबशहास अर्जे करून त्यांपासून तुम्हांला तीन लक्षांची दौलत देववूं. यैसे दोन्ही विचार तुम्हांला लिहिले आहेत. या दोन्हीमधील येक मनीं धरून मान्य करणें. हटाचे हातीं न देणें. आपल्यांत आपण गृह्कलह करावा आणि कस्टी व्हावें याचें कांहीं प्रयोजन नाहीं. याउपरी तर्‍ही आमचा आपला संधी व्हावा यैसी बुधी मनीं धरून वाटियाचा वेव्हार निर्गमून टाकणें. आणि सुखें असणें. गृहकलह बरा नव्हे. आम्हीं तरी वडीलप्रमाणें आजवरीं तुम्हांला सांगितलें; आतांहि सांगतों. ऐकाल तरी बरें. तुम्हीच सुख पावाल. नाइकाल तरी तुम्हीच कस्टी व्हाल. आमचें काय चालतें ? बहुत काय लिहिणें ? मर्यादेयं विराजते. ”

व्यंकोजीकडे वांटा मागण्याच्या कामीं महाराजांनीं 'सबूरी' कां केली ? आपण काय काय केलें याचा जो तपशील महाराजांनीं या पत्रांत दिला आहे तो देण्यांत महाराजांचा हेतु काय असेल ? राजेश्री गोविंदभट आदि 'भल्या लोकांना' महाराजांनीं प्रथम कां बोलावून घेतलें ? व्यंकोजीचें कोणतें लाघव महाराजांनीं वेळींच ओळखलें ? जो 'थोरपणाचा व इज्जतीचा नव्हे' अशा कोणत्या विचाराला महाराजांनीं आपल्या मनांत थारा दिला नाहीं ? 'तुरुक' म्हणून ज्यांचा तिटकारा महाराज करतात ते लोक कोण ? विचार करून उत्तर द्या. महाराजांच्या सैन्यांत एतत्प्रांतीय मुसलमान दाखल होते. महाराजांच्या आरमारांत सर्वश्रेष्ठ अधिकाराच्या ज्या दोन जागा होत्या त्यांपैकीं एका जागेवर मुसलमान अधिकारी होता. देवळें आणि मशीदी यांना महाराज सारखाच मान देत असत. मुसलमान साधुसंत आणि हिंदु साधुसंत यांत महाराजांना भेद दिसत नसे. या सर्व गोष्टी आदरपूर्वक अंतःकरणांत आणा आणि उत्तर द्या. व्यंकोजीचें मूर्खपणाचें व दुष्टपणाचें वर्तन पाहून, 'नवल वाटलें' असें महाराज म्हणतात; 'दुःख झालें,' 'त्वेष आला,' असलें कांहीं म्हणत नाहींत. यावरून आपण काय बोध घ्यायचा ? कष्ट कोणाला आणि केव्हां भोगावे लागतात याविषयीं महाराजांचा अभिप्राय काय दिसतो ? व्यंकोजी 'बऱ्या बोलानें देणारा नव्हे' हें ओळखून त्याच्याजवळ बोलणें काढण्यापूर्वीं, महाराजांनीं काय केलें होतें ? मागें एके ठिकाणीं आपण वाचलें : महाराज आपल्या अधिकाऱ्यांना सांगतात—'कलागती करावया गरज नाहीं.' आज आपण वाचलें : महाराज व्यंकोजीला म्हणतात—'गृहकलह करावा आणि कष्टी व्हावें याचें प्रयोजन नाहीं.' कलह आणि कलागती यांच्या बाबतींतली ही दृष्टि किती थोर आहे ? 'सर्वांनीं सुखें असावें' हीच महाराजांच्या अंतःकरणांतली प्रमुख प्रेरणा होती आणि म्हणूनच कलह व कलागती यांबाबत ही विशाल दृष्टि महाराजांना लाभली !

# १९. तृणानें अग्नि झांकितां ?

व्यंकोजीचें वर्तन पाहून महाराजांना कसें ‘नवल वाटलें,’ आणि त्याची कानउघाडणी महाराजांनीं कशी केली, तें आपण पाहिलें. जो ‘कांहीं विचार करीत नाहीं,’ आणि ‘धर्माधर्म विचारीत नाहीं’ अशा आणखी एकाची कानउघाडणी महाराजांनीं कशी केली आहे तें पाहूं.

ही कान उघाडणी ज्याची झाली तो असातसा कोणी नसून स्वत: औरंगजेब बादशहा होय !

“ नेकीची इच्छा करणार सत्यवचनी शिवाजी, ईश्वराची कृपा व बादशहाची मेहेरबानी, हे सूर्याप्रमाणें प्रसिद्ध आहेत. त्यांचा धन्यपणा मानून नंतर पत्र लिहितों.

अभीष्ट चिंतन करणार प्रारब्धयोगानें हुजूरून निरोपाशिवाय आलों. परंतु यथायोग्य सेवेचे सांप्रदायांत हजर आहें. ती चांगली सेवा व उत्तम प्रयत्न, हिंदुस्थान व इराण व तुराण व रूम व शाम येथील बादशहा व उमराव, मोगल व राजेलोक व राणे यांस व खेरीज सात मुलुखांचे रहाणार, व खुषकी व तरी येथील मुशाफर यांस, जाहीर आहेत. त्यापेक्षां आपलें अंत:करण समुद्राप्रमाणें आहे त्यासहि विदित जाहलेंच असेल. याजकरितां, कित्येक गोष्टी, ज्यांत आबालवृद्धांचें कल्याण राही, अशा लिहिल्या जातात.

आजवर नूरुद्दिन जहांगीर बादशहा यांणीं बावीस वर्षें बादशाही ईश्वरीं लक्ष ठेवून केली. नंतर स्वर्गास पोहोंचले. शहाजहानसाहेब यांणीं बत्तीस वर्षें पादशहात करून, उपरांत राहिलें आयुष्य चांगलेपणानें घालवून, निरंतर कीर्ति मिळविली. याविषयीं दृष्टांत, ‘जो पुरुष जिवंत असतांना लौकिकवान्, व मागें ज्याची चांगली कीर्ति असा जो, त्याजला अचल लक्ष्मी प्राप्त जहाली’, असें आहे.

सदरीं लिहिले पादशहांचा प्रताप व पराक्रम असा, कीं त्यांणीं दस्तुर व वहिवाटी केल्या; त्यांचें रक्षण करण्यास अलमगीर फकीरबंद जाहले. ते बादशहाहि जेझियापट्टी घेण्यास समर्थ होते. परंतु, ‘सारे लहानमोठे लोक जे

आपुलाले धर्मावर आहेत ते सर्व ईश्वराचे आहेत', असें जाणून कोणावर जुलूम करावा हें त्यांणीं मनांत आणिलें नाहीं. त्यांचे उपकाराची कीर्ति अद्याप आहे; व हरएक लहानमोठे यांचे मुखीं त्यांची स्तुति व आशीर्वाद आहे. जशी ज्याची नियेत तशी त्यास बरकत. त्या बादशहांची दृष्टि लोकांचे कल्याणांत होती. हल्लीं आपले कारकीर्दीत कित्येक किल्ले व मुलुख गेले व बाकी राहिले तेहि जातात. कारण कीं खराबी करण्याविषयीं कमतर नाहीं. रयत लोक खराब होत आहेत. सौदागर पुकारा करतात कीं हरएक महालचें उत्पन्न लाखास एक हजार येणें कठिण असें जाहलें. बादशाहा व बादशाहाजादे यांचे घरीं दारिद्र्याचा वास जाहला. तेव्हां पदरचे मनसबदार व उमराव यांची अवस्था कळतच आहे.

सारांश, शिपाई लोक हैराण व सौदागर पुकारा करितात; व मुसलमान रडतात; व हिंदु लोक मनांत जळतात; आणि कित्येक लोकांस पोटास मिळत नाहीं असें आहे. तेव्हां राज्य चालविणें कसें ? त्याजवर जेझियापट्टीचा उपद्रव या प्रकारचा; तो पूर्वपश्चिमपावेतों जाहीर जाहला आहे, कीं हिंदुस्थानचे पातशहा फकीर व ब्राह्मण व जैन व योगी व संन्यासी व बैरागी व अनाथ, गरीब थकलेले व पडलेले असे एकंदर लोकांपासून जेझिया घेतात; व यांतच पुरुषार्थ असें समजतात; व तैमुर पादशहाचें नांव बुडवितात; असें जाहलें आहे. त्यांत आज्ञा केली ती, ईश्वर जगाचा किंवा मुसलमानांचा आहे ? वाईट अथवा चांगला असो, हे दोन्ही ईश्वराचे निर्मित आहेत. कोठें महजीद आहे तेथें त्याचें स्मरण करून बांग देतात व कोठें देवालय आहे तेथें घंटा वाजवितात. त्यास कोणाचे धर्मास विरोध करणें हें आपले धर्मापासून सुटणें व ईश्वराचें लिहिलें रद्द करून त्याजवर दोष ठेवणें आहे. याविषयीं चांगलें अगर वाईट, जें पहावें त्यास रद्द करूं नये. पदार्थाची निंदा करणें हें पदार्थ करणारावर शब्द ठेवणें आहे. न्यायाचे मार्गानें पाहतां, जेझिया पट्टीचा कायदा केवळ गैर. पेशजी सुलतान अहंमद गुजराथी हा असा गैरचालीनें वागला, तो लौकरच बुडाला. त्यास आपण या वृद्धपकाळीं असें बद्दु होणें हें पराक्रमास अगदीं योग्य नाहीं. याविषयीं दृष्टांत : जुलूम ज्याचेवर जाला त्याणें खेद करून, 'हाय हाय' म्हणून मुखानें धूर काढल्यास त्या धुरानें

जितकें लवकर जळेल, तितकें जलदीनें जळता अग्नीहि समंधास जाळणार नाहीं. अंतःकरण पातकानें मलिन जालें तें स्वच्छ करावें ही चांगली सल्ला आहे. याजवर हिंदु लोकांस पीडा करण्यांतच धर्म आहे असें मनामध्यें आलें असल्यास, आधीं राजा राजसिंग यांजपासून जेझिया घ्यावा म्हणजे इकडून मिळणेंस कठिण नाहीं. उपरांत सेवेसी हजीर आहें. परंतु गरीब अनाथ ते मुंग्या, चिलटांसारखे आहेत. त्यांस उपसर्ग करण्यांत कांही मोठेपणा नाहीं. पदरची मंडळीहि पाहतां पाहतां तृणानें अग्नि झांकितात याचें आश्चर्य वाटतें ! अस्तु. राज्याचा सूर्य हा प्रतापाचे उदयाचलापासून तेजस्वी असो. "

महाराज ज्या 'नेकी' ची अपेक्षा करतात ती नेकी कोणीं आचरावयाची आहे ? कोणकोणत्या बाबतींत महाराजांना आत्मविश्वास होता ? या पत्रांत महाराजांनीं ज्या 'गोष्टी' लिहिल्या आहेत त्या कोणाकोणाच्या कल्याणाच्या आहेत ? अकबराच्या यशाचें कारण काय होतें असें महाराज या पत्रांत म्हणतात ? शहाजहान बादशहाचा उल्लेख करताना महाराजांनीं कोणतें सौजन्य दाखविलें आहे ? औरंगजेबाच्या राज्यांत स्वतः बादशहा आणि त्याचे मनसबदार व उमराव यांच्या घरीं 'दारिद्र्याचा वास' किती घोर होता असें महाराज म्हणतात ? औरंगजेबाच्या रयतेच्या दुरवस्थेचें दिग्दर्शन करतांना महाराजांनीं कोणकोणता तपशील दिला आहे ? औरंगजेबाच्या पूर्वजांच्या (खऱ्या-खोट्या) गौरवाची भीड औरंगजेबाला घालण्याचा प्रयत्न जो महाराजांनीं केलेला दिसतो तो कशासाठीं केला असावा ? या पत्रांत कांहीं वाक्यें अशीं आहेत कीं त्यांची गणना सुभाषितांत व्हावी. अशीं वाक्यें कोणतीं ? या पत्रांत आर्जवें कुठकुठें आहेत ? निर्भर्त्सना कुठकुठें आहे ? आवाहनें कशाकशाला आणि कुठेंकुठें आहेत ? या पत्रांत कोणता भाग 'आव्हानाचा' आहे ? या पत्रांत 'आग्रह' आहे काय ? आग्रह हा एक अनिष्ट प्रकार आहे हें तुम्हांला पटतें काय ? समाजांत आग्रहाला केव्हां स्थान मिळतें ? हें पत्र महाराजांनीं इ. स. १६७९ च्या अखेरीला लिहिलें. १६७९ सालीं महाराजांचें वय किती होतें ? त्या वर्षी औरंगजेबाचें वय किती होतें ? हीं जुनीं माणसें–एकमेकांचे हे शत्रु–नेहमीं ईर्षेची, युयुत्सुपणाची आणि हुमरीतुमरीची भाषा बोलत असलीं पाहिजेत असें आपल्यापैकीं कांहीं जणांना वाटतें हें खरें ना ? महाराजांच्या या पत्रांत जो सुसंस्कृतपणा व्यक्त होतो त्यावरून पाहतां आपल्यापैकीं कांही-जणांच्या 'त्या' समजाविषयीं आपण काय म्हणायचें ? या पत्राच्या शेवटच्या वाक्यानें काय व्यक्त होतें ?

## २०. टोपीकर वरकड सावकारांसारखे नव्हत !

इंग्रजांचें राज्य जें आपल्या देशावर होऊन गेलें तें राज्य आपल्यावर आलें कसें, आणि दीडशें पावणेदोनशें वर्षेंपर्यंत तें राज्य इकडे टिकून राहिलें कसें याविषयीं आपल्यांतले लोक काय काय बोलतात ?

अमात्य रामचंद्रपंत बावडेकर यांचा हा लेख वाचा म्हणजे तुम्हांला मार्गदर्शन मिळेल, कीं इंग्रजांसारख्या परकीयांकडे आपण कोणत्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. इंग्लंड देशाचा (आणि इंग्लश लोकांचा) इतिहास आतां आम्हीं यथास्थित शिकलों आहों. तरीहि त्या इतिहासाचें मर्म आम्हांला समजलें आहे—त्यापासून आम्हीं बोध घेतला आहे—असें आपल्याला म्हणतां यायचें नाहीं. ज्याचें आकलन आम्हांला आजसुद्धां झालेलें नाहीं त्यांतला कितीतरी भाग रामचंद्रपंतांनीं सहज पारखला होता. रामचंद्रपंतांसारख्या थोरांची साथ महाराजांना लाभली म्हणूनच महाराजांचा हुरूप टिकून राहिला !

"साहुकार म्हणजे राज्यश्रीची शोभा. साहुकाराच्या योगानें राज्य आबादान होतें. न मिळे त्या वस्तुजात राज्यांत येतात. तें राज्य श्रीमंत होतें. पडले संकटप्रसंगीं पाहिजे तें कर्जवाम मिळतें. तेणेंकरून आलें संकट परिहार होतें. साहुकाराचे संरक्षणामध्यें बहुत फायदा आहे. याकरितां साहुकारांचा बहुमान चालवावा. कोणेविषयीं त्यांजवर जलाल अथवा त्याचा अपमान होऊं न द्यावा. पेठांत दुकानें, वखारी घालवून, हत्ती, घोडे, जरमिना, पशमी आदिकरून वस्त्रजात, रत्नें, शस्त्रें, आदि करून अशेष वस्तुजात यांचा उदीम चालवावा. हुजूरबाजारामध्येंहि थोर थोर साहुकार आणून ठेवावे. वर्षसंबंधें तसेंच लग्नादि महोत्साहींहि त्यांचे त्यांचे योग्यतेनुरूप प्रतिष्ठेनें बोलावून आणून वस्त्रपात्र देऊन समाधान करीत जावें. परमुलुखीं जे जे सावकार असतील त्यांचीं समाधानें करून आणावे. त्यांस अनुकूल न पडेच तर असतील तेथेंच त्यांचें समाधान रक्षून, आपली माया लावून, त्यांचे मुतालिक आणवून त्यांस अनुकूल जागा दुकानें देऊन ठेवावें. तसेंच दर्यावर्दी सावकार यांसहि बंदरोबंदरीं कौल पाठवून आमदरफ्ती करावी. साहुकारांमध्यें फिरंगी व इंग्रज व वलंदेज व फराशीस टोपीकर हेहि लोक साहुकारी करितात. परंतु ते वरकड सावकारां-

सारखे नव्हत. त्यांचे खावंद, प्रत्येक राज्यच करीत आहेत. त्यांचे हुकुमानें, त्यांचे होत्साते, हे लोक या प्रांतीं साहुकारीस येतात. राज्य करणारांस स्थळलोभ नाहीं असें काय घडो पाहतें ? तथापि टोपीकरांस या प्रांतीं प्रवेश करावा, राज्य वाढवावें, स्वमतें प्रतिष्ठावीं हा पूर्णाभिमान. तदनुरूप स्थळोस्थळीं कृतकार्यहि जाले आहेत. त्यास ही हट्टी जात; हातास आलें स्थळ मेल्यानें सोडवयाचे नव्हेत. यांची आमदरफ्ती 'आले गेले' इतकीच असूं द्यावी. त्यांस केवळ नेहमीं जागा कधींहि देऊं नये. जंजिऱ्यासमीप तों या लोकांचें येणें जाणें सहसा होऊं देऊं नये. कदाचित् वखारीस जागा देणें जाली तर खाडीचे मोबारीं समुद्रतीरीं न द्यावी. तसे ठिकाणीं जागा दिल्यानें जोंपर्यंत आपले मर्यादेनें आहेत तों आहेत; नाहीं ते समयीं आरमार, तोफा, दारुगोळा हेंच त्यांचें बळ. आरमार पाठीशीं देऊन त्याचें बळें त्या बंदरीं नूतन किल्लाच निर्माण करणार, तेव्हां इतकें स्थळ राज्यांतून गेलें. याकरितां जागा देणेंच तर लांब खाडीं गांव दोन गांवें राजापुरीसारखी असेल तेथें. फरांशिसांस जागा दिल्हा होता त्या न्यायानें, दोन चार नामांकित थोर शहरें असतील त्यांमध्यें जागा द्यावा. तो असा कीं तीच जागा शहराचे अहारीं, शहराचा उपद्रव चुकवून नेमून देऊन वखारी घालाव्या. त्यांस इमारतीचें घर बांधूं देऊं नये. याप्रकारें राहिले तर बरें. नाहींतर याविषे प्रयोजन नाहीं. आले गेले असून त्यांचे वाटे आपण न जावें; आपले वाटे त्याणीं न जावें इतकेंच पुरे.

गनीमाचे मुलूखांतील गनीमाचा मुलूख मारिला यामुळें अथवा दर्यावर्दीमुळें साहुकार सांपडले तर अवसर पाहून त्यांशीं खंड करावा. खंडाचा वसूल घेणें तोहि त्यास राखून घ्यावा. खंड फारीक जाल्यावर थोडी बहुत त्यांशीं मेहेमानी करून, बहुमानें, त्यांस त्यांचे स्थळास पाठवून द्यावें. गनीमाकडील सेवक लोकांस जें शासन आहे तें सावकार लोकांस उचित नाहीं."

साहुकार हा शब्द जो या मजकुरांत आला आहे त्याचा अर्थ काय ? सावकार 'जोडण्यासाठीं' राज्यकर्त्यांनीं काय काय करावें ? यूरपिअन् व्यापारी इकडे कसे आले, यांच्या मागें त्यांचे पालक आणि पोशिंदे कोण आहेत, याचा किती बारकावा-अमात्यांनीं पाहून घेतला आहे ? 'राज्य करणारे' आणि 'स्थळलोभ' यांचा अन्योन्य संबंध कसा सुचविला आहे ? यूरपिअन् व्यापारी कोणकोणत्या क्षेत्रांत 'कृतकार्य' झाले होते ? यूरपिअन् व्यापाऱ्यांना जागा देतांना काय काय खबरदारी घेतली पाहिजे ? 'युद्धकैदी' सांपडलेल्या सावकारांशीं कसें वागावें ?

## २१. माझ्या मराठी मातीचा—

हें पुस्तक संपादीत असतां माझी भूमिका अशी आहे, कीं—

सार्थ अभिमानानें, सोबत जबाबदारीची जाणीवहि ठेवून—आणि अर्थातच जगन्नियंत्या परमेश्वराशीं कृतज्ञ राहून व त्याच्यासमोर लीन होऊन—आपण महाराष्ट्रीय मंडळी म्हणूं शकतों—इतर कोणाला कमी न लेखतां आपण म्हणूं शकतों—कीं जगाला वंद्य असे अनेक स्त्रीपुरुष आमच्या या महाराष्ट्रभूमींत जन्माला आले आहेत; या देशांत वाढले आहेत; आणि जगाच्या कल्याणाला हातभार लावण्याचें आपलें काम उरकून, जिकडून ते आले होते तिकडे परत गेले आहेत. मनुष्यमात्राला जिवंतपणाची आणि माणुसकीची शिकवण देणाऱ्या महाराष्ट्रीय संतांची मालिका तर प्रसिद्धच आहे. शिवाय जगांत आजपर्यंत होऊन गेलेल्या राजांना आदर्श असा राजाहि महाराष्ट्रानें जगाला दिला आहे. 'पुण्यश्लोक नृपावळींत' खरोखर 'पहिले' अशा शिवाजीमहाराजांची थोरवी जेव्हां आपण महाराष्ट्रीय मंडळी जगाला पटवून देऊं, तेव्हां जगांतल्या सर्व भाषा आपापल्या रीतींनीं, पण एका आवाजानें, म्हणतील, कीं 'झाले बहु, असतिल बहु, होतीलहि बहु परंतु या सम हा !'

शिवाजीमहाराजांच्या अलौकिकपणाचीं अनेक प्रत्यंतरें आहेत. पण त्या सर्व प्रत्यंतरांचें 'सार' हें, कीं महाराजांना 'इज्जतीची चाड' होती ! आणि तीहि कोणाच्या इज्जतीची ? महाराजांना असलेली ती चाड कोणा याच्या त्याच्या वा अशातशाच्या इज्जतीची चाड नव्हती. महाराजांना असलेली ती चाड महाराष्ट्र देशांतील सबंध जनतेच्या इज्जतीची—मराठ्यांच्या इज्जतीची—चाड होती ! जीं मूल्यें व्यक्त करण्यासाठीं आपण आजचे लोक 'मानवता,' 'माणुसकी', 'संस्कृति', यांसारखे शब्द परोपरींनीं वापरतों तीं मूल्यें 'इज्जत' हें नांव घेऊन महाराजांच्या मनांत वावरत होतीं !

महाराजांचें सर्व जीवन म्हणजे सर्वसाधारण माणसांना त्यांच्या इज्जतीची आण घालून, 'इज्जतीची कदर करा' असें सांगून दिलेला, 'माणुसकीनें जगा' असा 'आदेश' आहे. हा आदेश महाराजांनीं, 'सर्व जुमलेदार, सर्व

हवालदार, सर्व कारकून, सर्व खलक आणि सर्व खासे ' यांना दिला आहे; त्यांतून कोणालाच वगळलेलें नाहीं. एकजात सर्वांनीं आपली स्वतःची, एकमेकांची आणि सर्वांची माणुसकी सांभाळायची आणि तिची कदर करायची असा तो आदेश आहे !

तो आदेश ज्यावेळीं दिला गेला त्यावेळेपुरता, आणि प्रत्यक्ष ज्यांना तो दिला गेला त्यांच्यापुरता, नाहीं. तो आदर्श देशकालातीत आहे. तो तेव्हांपासून आतांपर्यंत अबाधित राहिला आहे; आणि आतांपासून कालाच्या अंतापर्यंत अबाधित राहणारा आहे !

हें पुस्तक वाचणाऱ्या माझ्या बालमित्रांना मला आग्रहपूर्वक सांगावयाचें आहे, कीं आमच्या इतिहासाचा जो अभिमान आपण मराठे आपल्या अंतःकरणांत वागवतों त्या अभिमानाबाबत अशी शंका तुमच्या मनांना शिवूंहि देऊं नका, कीं हा अभिमान म्हणजे ' वडिलांची कीर्ति सांगण्या ' चा अर्धवटपणा असेल. आमचा इतिहास म्हणजे केवळ ' वडिलांची कीर्ति ' नाहीं; ती या मराठी मातीची महति आहे; ती आमची परंपरा आहे; आणि आपण मराठे एकसारखे ती परंपरा सांभाळीत—उजळीत आहोंत !

१९१४ ते १९१८ सालच्या—पहिल्या—महायुद्धांत मराठा शिपाई-गड्यांनीं—पुढीलप्रमाणें—पटवून दिलें आहे, कीं अभिमानास्पद अशी आम्हां मराठ्यांची माणुसकीची परंपरा आम्ही कशी सांभाळली आहे; कशी टिकवून वाढीला लावली आहे :

त्या पहिल्या जागतिक युद्धाच्या समाप्तीनंतर पुढें कांहीं काळ, विजयी दोस्त राष्ट्रांचीं सैन्यें, पराभव पावलेल्या शत्रूंच्या मुलुखांत, बंदोबस्तासाठीं म्हणून, ठिकठिकाणीं राहिली होतीं. ईजिप्त व पॅलेस्टाइन् या प्रदेशांत बंदो-बस्त राखण्याचें काम ब्रिटिश हिंदुस्थानी फौजांकडे होतें. जनरल ॲलन्बी हे त्या सैन्याचे अधिपति होते.

जनरल ॲलन्बी हे एक असामान्य रणकुशल असे सेनापति होते. शिवाय ते मोठे धोरणी आणि श्रेष्ठ प्रतीचे असे मुरब्बी मुत्सद्दी होते. ज्या लोकांशीं त्यांचा संबंध येई त्यांचे गुणदोष ते नीट समजून घेत. आपलीं उद्दिष्टें साधण्याच्या कामीं त्या लोकांच्या गुणांचा जो उपयोग होण्यासारखा असेल तो

करून घ्यायचा, आणि आपलीं उद्दिष्टें साधण्याच्या कामीं त्या लोकांचे दोष आड येणार नाहींत अशी खबरदारी घ्यायची, या कामीं जनरल ॲलन्बी यांचा हातखंडा असे. त्यांच्या आवतींभोंवतीं असलेल्या माणसांच्या अंतरंगांत जें काय चाललें असेल त्याचा ठाव ते नेहमीं घेत आणि त्यावरून आपल्या हाल-चाली आंखीत.

जनरल ॲलन्बी यांच्या हुकुमतीखालीं जें हिंदी सैन्य होतें त्यांत मराठे, राजपुत, जाट, शीख, गुरखे, पठाण इत्यादि वेगवेगळ्या जमातींचे लोक होते. या जमातींतील जमादार, सुभेदार-मेजर अशा अधिकारी वर्गाला जनरल ॲलन्बी यांनीं प्रश्न केला :

" वीरांनो, या लढाईंत तुम्हीं पराक्रमाची शर्थ केली आणि दोस्तांना विजयश्री मिळवून दिली. पण ही लढाई इतकी दीर्घ काळ चालली, आणि या लढाईसाठीं तुम्हांला तुमच्या देशापासून इतकें दूर यावें लागलें. अशीच लढाई जर पुन्हां झाली, तर पुन्हां आपलीं घरेंदारें सोडून, लढाईसाठीं, इतके दूरवर तुम्ही याल काय ? "

जनरल ॲलन्बी यांचा हा प्रश्न मोठा मार्मिक होता.

त्या मार्मिक प्रश्नाला जें सात्वेश उत्तर मराठा लढवय्यांनीं दिलें तें मराठ्यांच्या गौरवशाली परंपरेला शोभेल असें होतें. महाराष्ट्राचे हे सत्पुत्र म्हणाले :

" गेलीं चार वर्षें झाली तसलीच लढाई जर पुन्हां होईल, आणि ज्या गोष्टी या लढाईंत झाल्या तसल्याच गोष्टी जर त्या लढाईंत होणार असतील तर त्या लढाईंत भाग घेण्यासासाठीं आम्ही मराठे लोक येणार नाहीं. आमचीं घरेंदारें आणि आमचे इष्टमित्र वगैरे सर्व सोडून या लढाईवर येण्यासाठीं जेव्हां आम्ही निघालों तेव्हां आम्ही समजत होतों कीं जगांत कुठेंतरी घोर अन्याय माजला आहे, आणि त्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीं, त्या अन्यायामुळें असहाय्य झालेल्या लोकांचीं घरें-दारें आणि त्यांचे बालबच्चे यांचें रक्षण करण्यासाठीं, आम्ही धांवून जात आहों. पण खरोखर आम्हीं काय केलें आहे ? आम्हीं घरादारांची नासधूस केली आहे आणि मुलुख बेचिराग केले आहेत. आम्हीं उद्योगधंद्यांची बेहद्द मोडतोड केली आहे. ज्या लोकांनीं कोणाचेंच कांहीं वांकडें केलेलें नव्हतें अशा लोकांचे सुखाचे संसार आम्हीं

उध्वस्त केले आहेत आणि त्यांच्या मुलांबाळांना रानोमाळ वणवण करायला लावलें आहे! आम्हीं केलेला संहार व विध्वंस यांचा विचार आम्हीं करतों तेव्हां आमच्या अंतःकरणांत काहुर माजतें! असल्या केवळ नृशंसपणाला आम्हीं 'युद्ध' म्हणत नाहीं. असल्या 'युद्धासाठीं' आम्हीं उत्सुक नाहीं. लोकांचे संसार, त्यांचे रोजचे आचार-विचार, यांच्या रक्षणासाठीं तरवारी परजायच्या असतील तिथें मात्र आम्ही अवश्य धावून जाऊं—"

आम्हां मराठ्यांच्या माणुसकीची ही परंपरा, अशा रीतीनें, आजसुद्धां जिवंत आहे. या महाराष्ट्रभूमींत जन्म घेऊन तिला पुनीत करून गेलेल्या आमच्या संतांनीं ही परंपरा आम्हां मराठ्यांच्या रोमरोमांत भिनवून आमचा स्वभावच तसा बनवून दिला आहे. महाराष्ट्रीय माणुसकीची ही परंपरा श्रीशिवरायाच्या रूपानें मूर्तिमंत वावरून गेली आहे. मराठ्यांच्याच नव्हे तर सर्वांच्याच माणुसकीचें जतन व्हावें यासाठीं श्रीशिवरायांचा अवतार होऊन गेला आहे.

मराठी परंपरेची पूजा करणाऱ्या, आणि श्री शिवाजीमहाराजांविषयीं भक्तीच्या, अशा कांही कवितापंक्ति, या पुस्तकांत कांहीं ठिकाणीं मीं जोडल्या आहेत. या पंक्ति मी निवडून काढलेल्या नाहींत; सहजीं आठवलेल्या अशा आहेत. त्या ओळींचा उपयोग केल्याबद्दल सर्वश्री माधव (काटदरे), तळवलकर, माडखोलकर, वसंतविहार, आणि लोंढे यांचा मी ऋणी आहें. सिंधुदुर्ग किल्ल्याच्या स्तुतिपर कांहीं ओळी मला पाहिजे होत्या, त्यासाठीं श्री. वसंतराव म्हापणकर यांच्याकडे विचारलें असतां त्यांनीं, अत्यंत आपुलकीनें चित्रगुप्त बखरींतील ओळी पाठविल्या त्या, यासोबत, मी कृतज्ञतापूर्वक जोडीत आहें:

• • •

अनुक्रम २५००९
विभाग बाद
क्रमांक ८०९
नों. दि. १०१५८

# सिंधुदुर्गाची उभारणी

( चित्रगुप्त बखरींतील उतारा पृष्ठ १३१ ते १३७)

सिंधुदुर्ग असेच कौस्तुभ मणी हा रत्न वीलोकितां ।
नाहीं आन विधीच ( यास ) वदला याचीच या योग्यता ॥
देवादी असुरांप्रतीहि भुधरां दिल्हा नसे सागरें ।
तो हा शीवनृपास लाभ घडला श्रीशंकराच्या वरें ॥ १ ॥

सिंधुदुर्ग समर्थ जाण मणि हा वीराजला भूतळीं ।
दुष्टांचें भय आगळें म्हणुनियां संरक्षिला म्हाजळीं ।
सूवर्णांकित द्वारका तदुपरी लंका नये तूलितां ।
कौस्तुभाहुनि आगळाचि गरिमा त्याचीच या योग्यता ॥ २ ॥

सिंधूचि उपमा सिंधूसिच असे तैसीच त्या हो नभा ।
ऐसा अर्थ विलोकिजेच विदुषे आमोघ दावी प्रभा ॥
जंजीरा महि मूल्य (वान) मणि हा वीराजला या क्षिति ।
त्याची साक्ष तयाप्रतीच प्रभुजी सर्वत्र वाखाणिती ॥ ३ ॥

किल्ले आणिक जंजिरे गणुनियां केली नृपें मालिका ।
सिंधुदुग समर्थ (त्यांत) मणि हा वीराजला हो निका ॥
इत्यादीक स्थळें जशीं उडुगणें चंद्रोदया त्यां नसे ।
जंजीरा विधु दूसराच भुतळीं हो सत्य जाणां असे ॥ ४ ॥

सिंधुदुर्ग स्थळावरूनि चपळें लंका किजे सांडणें ।
जंजीरा अति आर्यतामहित कीं मेरूसि केलें उणें ॥
कालवी फुलपरी अयोग्य नयनें दासाच वीलोकितां ।
नाहीं या उपमा दुजी त्रिभुवनीं याचीच या योग्यता ॥ ५ ॥

ती. डी. टी. ...



सिंगालदीप रमणीय हुनावराला ।
ओवाळणी करुनियां त्यजणें तयाला ॥
वीलायता, सकळा ती हिनताच आली ।
गोमांतकादिक स्थळें तृणतुल्य झालीं ॥ ६ ॥

तैसीचाचहि पूर्तकाल उपमा पावेच ना सर्वथा ।
सिंधुदुर्ग समर्थ जाण विलसे इत्यादि पाहों वृथा ॥
ऐसा हा नृपतीस (दुर्ग) सदयें श्रीसागरें अर्पिला ।
काळाचि गति भिन्नताच घडली प्रत्यक्ष नीरिक्षिला ॥७॥


खांदेरी जयदुर्ग जाण विजया नाहीं कदा मान्यता ।
तैसी राजपुरीच खोकरि जगीं झालीच आयोग्यता ॥
जाणां मुंबईचें सदैव लवलें दृष्टी त्वरें काढिजे ।
सिंधूदुर्ग समर्थ एक विलसे त्यातेंच वीलोकिजे ॥ ८ ॥

झाल्या कुंठित ऊपमाच अवघ्या अन्यत्र आणूं नका ।
जंजीरा घणि आर्यताच विलसे आहे जगीं हा निका ॥
बोरवाडा आणि रेडियाच चपळे झाडावया लाविजे ।
कूलाबा आणि भालदार चतुरें प्रत्यक्ष वीलोकिजे ॥ ९ ।

नागांगना वसइ नृत्य करी सदैवा ।
तैसीच ते सुरत दाखवि सर्व भावां ॥
येल्लूर जाण नटवा मनरंजनाला ।
आपेक्षिला निशिदिनीं अति मान त्याला ॥ १० ॥

IRBK-0107611

जाणां तो जलिं पद्मदुर्ग म्हणवी तांडेल आहे सदा ।
उंदेरी अति सान हीनचि असे दीनत्व भावी पदा ॥
सिंधूदुर्ग प्रिया अती रमणिका रत्नागिरी नेटकी ।
दूजी अंजनवेलि फार विलसे आहे स्वरूपें निकी ॥ ११ ॥



असे दौलताबाद डोंबारजी हे।
उडी मारिली नीटकी ते न राहे॥
शिलेमान पाहों क्षिती पापरूपी।
यमूना जळीं तो दडाला कुरूपी॥ १२॥

किल्ले कोट अगण्य जाणचि असे सेना सदा भूतळीं।
सिंधुदुर्ग (चि) स्वामि (हाहि) सकलां आशोभ आहे जळीं॥
त्याची नाटकिं वर्णिजीच गरिमा चातुर्य वीलोकिजे।
सन्मानें प्रति पाळणासि करणें हें इतुकें अर्पिजे॥ १३॥

सिंधुदुर्ग जंजिरा जगीं अस्मानी तारा, जैसें मंदिराचें मंडन श्रीतुळसी वृंदावन तैसा महाराजांचे राज्याचें भूषणप्रद अलंकार अर्थ मुक्ताफल तद्वत् महाराजांचे संपूर्ण राज्यांत महीमोल्य किंबहुना अधिकोत्तर सुप्रिय मुकुटमणि शिवलंका जंजिरा शिवाजी महाराज छत्रपति सिंहासनाधीश्वर यांचा—

॥ शुभम् भवतु ॥